मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

मुंबई कार्यालय
बोरा बजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
फोन : ०२२ ३१८५ ०७३५

पालघर कार्यालय
२०८/बी, लोकमान्य बिल्डींग, तालुका पंचायत समिती कार्यालयासमोर, पालघर, ४०१४०४ मो. ९८९२९६८७२५

नाशिक कार्यालय
'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर, धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२. मो. ९८९०१०९९७८

वितरण
मो. नं. ८४२४९३६४३६

नाशिक | सोमवार, २८ एप्रिल २०२५ | वर्ष: ६ | अंक:१३० | पाने-८ | किंमत रू. २ + वितरण खर्च रू. १ एकूण रू.३

## ईडीचे कार्यालय असलेल्या इमारतीला आग

**मुंबई, दि. २७ प्रतिनिधी**

दक्षिण मुंबईतील फोर्ट परिसरातील बेलार्ड इस्टेटमधील कैसर-ए-हिंद इमारतीच्या चौथ्या मजल्यावर मध्यरात्री दोन अडीचच्या सुमारास भीषण आग लागली. सक्तवसुली संचालनालयाचे कार्यालय या इमारतीत आहे. फोर्ट परिसरात बेलार्ड इस्टेट परिसरात असलेल्या या इमारतीत शनिवारी मध्यरात्री २ वाजल्यानंतर ही आग लागली. आग लागल्यावर अग्निशमन दलाने तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. रविवारी दुपारी बारानंतर ही आग विझवण्यात अग्निशमन दलाला यश आले. आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी घटनास्थळी ८ अग्निशमन इंजिन, ६ जंबो टँकर, १ एरियल वॉटर टॉवर टेंडर, १ ब्रीदिंग अ‍ॅपरेटस व्हॅन, १ वॉटर क्विक रिस्पॉन्स वाहन आणि १०८ रुग्णवाहिका असा मोठा ताफा होता.

## अग्राग्रलेख
## खरीखरी

## स्वाती पांडे यांचे मृगजळ

थोड्या दिवसांपूर्वी अमरावती ते मुंबई विमानसेवा सुरू करण्यात आली. त्यावेळी एम ए डी सी च्या एमडी स्वाती पांडे यांनी अमरावती येथे मोठ्या थाटात पत्र परिषद घेऊन अमरावती विमानतळाचे विशेषतः वर्णन केले होते. प्रादेशिक संपर्क योजनेच्या अंतर्गत अमरावती ते मुंबई आणि मुंबई ते अमरावती अशी सेवा २१०० रुपयात देण्यात येणार, असे घोषित केले होते. तेव्हा पांडे बाईने मोठा उदारतेचा आव आणून, प्रतिव्यक्ती ४०६२ रुपये इतका खर्च असूनही २१०० रुपयात आम्ही प्रवाशांना ही सेवा देणार, असे जाहीर केले होते. मात्र आता या बाईने दाखवलेले मृगजळ प्रत्यक्षात किती फोल होते. हे दिसून आलेले आहे. आता या सेवेचे दर आठ हजार रुपयापर्यंत गेलेले आहेत. म्हणजे प्रत्यक्ष खर्चाच्या जवळपास दुप्पट पैसा प्रवाशांकडून वसूल करण्यात येत आहे. आरसीएस उड्डाण म्हणजे क्षेत्रीय संपर्क वाढवण्याच्या उद्देशाने आणलेला जो काही उदारतेचा आव दाखवला होता. तो आता गुंडाळण्यात आला आहे. याच महिन्यात १६ तारखेला या विमान सेवेचा सोहळा पार पडला. आठवड्यातील तीन दिवस म्हणजेच सोमवार, बुधवार आणि शुक्रवार या दिवसांमध्ये ७२ प्रवाशांसाठी नियमित फ्लाईट सुरू होईल. असे घोषित करण्यात आलेले होते. अमरावतीकरांना चार ते आठ दिवस सेवा दिल्यानंतर आता जो काही भाव वाढीचा भुर्दंड बसणार आहे. त्याला प्रवाशांमधून घोर विरोध दर्शविण्यात येत आहे. त्याचवेळी याच पांडे बाईंनी अमरावती ते अहमदाबाद विमान सेवेची घोषणाही केलेली होती. सध्याच्या घडीला अमरावतीत केवळ दिवसाच विमान उतरू शकते. या सर्व कार्यक्रमात प्रवाशांवर जास्तीत जास्त प्रवास भाड्याचा भुर्दंड कसा बसेल. तेच जणू लक्षपूर्वक पाहण्यात येत आहे. सुरुवातीला मारे गाजावाजा करून प्रवाशांना आकर्षित करण्यात आले. कमी भाड्याचे मनाचे मांडे खाणाऱ्या, अमरावतीकरांना या पांडे बाईंनी आता चक्क वाऱ्यावर सोडलेले दिसते. आपली जनता कमालीची सोशिक आहे. आता काही दिवसानंतर अमरावती विमानतळाच्या विकासाची योजना आखण्यात आलेली आहे. त्यानंतर अमरावतीमध्ये दक्षिणातील अशियातील सर्वात मोठे पायलट ट्रेनिंग सेंटर म्हणजेच वैमानिक घडविण्यासाठी प्रशिक्षण केंद्र सुरू करण्यात येईल असे सांगण्यात आले. अमरावती किंवा पश्चिम विदर्भासाठी सुरू करण्यात आलेला हा ड्रीम प्रोजेक्ट आता अचानक महाग झालेल्या प्रवास भाड्यामुळे, गटांगळ्या खात आहे असे दिसते. अमरावती सारख्या शहराला निश्चितच विमानसेवेची गरज होती. ती सेवा सुरू झाली म्हणून अमरावतीमध्ये हर्षाचे वातावरण होते. ही विमान सेवा सुरू करताना जणू काही आम्ही अमरावतीकरांवर उपकारच करीत आहोत. अशा भावनेने अमरावतीकरांना जे गाजर दाखवले गेले. त्यामुळे आता केवळ अमरावतीच नव्हे, तर या विभागातील इतर जिल्ह्यांनाही त्याचा फायदा घेता आला असता. कारण आतापर्यंत विदर्भातून केवळ नागपूर शहरातूनच विमानसेवा उपलब्ध होती. आता अमरावतीसही तो मान देताना अमरावतीकरांच्या कडून पुरेपूर वसुली करण्याचा डाव स्पष्टपणे दिसून आला आहे. यामुळेच उद्या अमरावतीकर मुंबईला जाण्यासाठी या महागड्या सेवेचा उपयोग करण्याएवजी, केवळ तीन हजार रुपयात दुरांतो सारख्या गाडीने रात्री मस्तपैकी झोपून प्रवास करणे पसंत करतील. त्यामुळेच या विमानसेवेपेक्षा आपली दुरांतो बरी, हीच बाब ठरणार आहे खरी. हे आता अमरावतीकरांनी मनोमनी ठरवलेले दिसते. मात्र स्वाती पांडे यांच्या मृगजळामुळे अमरावतीकरांची चांगलीच करमणूक झाली. एवढे मात्र खरे!

nagpurpost@gmail.com
Mob.No.9922970023

# बैसरन खोऱ्यात एनआयएचा तपास
## 26/11 सारख्या कटाचा संशय



**श्रीनगर, दि. २७ वृत्तसंस्था**

पहलगाममधील बैसरन खोऱ्यात झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर राष्ट्रीय तपास संस्थेचे (एनआयए) पथक जम्मू काश्मीर पोलिसांच्या मदतीला धावून गेले आहे. बुधवार २३ एप्रिलपासूनच एनआयए बैसरन खोऱ्यात शोध मोहिमेसाठी तळ ठोकून आहे. दरम्यान राष्ट्रीय तपास संस्थेच्या (एनआयए) पथकांनी पुरावे शोधण्याचे काम तीव्र केले आहे,

एनआयएच्या पथकामध्ये दहशतवादविरोधी यंत्रणेचे एक आयजी, एक डीआयजी आणि एक एसपी यांचा समावेश आहे. हे पथक शांत आणि रमणीय बैसरन खोऱ्यात त्यांच्या डोळ्यांसमोर घडलेला भयानक हल्ला पाहणाऱ्या प्रत्यक्षदर्शींची चौकशी करत आहेत. काश्मीरमधील सर्वात भीषण दहशतवादी हल्ल्यांपैकी एक घडवून आणणाऱ्या घटनांचा क्रम एकत्रित करण्यासाठी प्रत्यक्षदर्शींची बारकाईने चौकशी केली जात असल्याचे माहिती एनआयए अधिकाऱ्यांनी दिली आहे.

दहशतवाद्यांच्या कार्यपद्धतीचे संकेत मिळविण्यासाठी तपास करणाऱ्या एनआयए पथकांकडून प्रवेश आणि निर्गमन बिंदूंची बारकाईने तपासणी केली जात आहे. फॉरेन्सिक आणि इतर तज्ञांच्या मदतीने पथके, देशाला हादरवून टाकणाऱ्या भयानक हल्ल्याला कारणीभूत असलेल्या दहशतवादी कटाचा पर्दाफाश करण्यासाठी पुराव्यांसाठी संपूर्ण परिसराची कसून तपासणी करत आहेत, असे देखील एनआयएने म्हटले आहे.

केंद्र सरकारने जम्मू-काश्मीरच्या पहलगाम येथे २२ एप्रिल रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा तपास राष्ट्रीय तपास संस्थेकडे (एनआयए) सोपवला आहे. गृह मंत्रालयाने या संदर्भात आदेश जारी केले असून, जम्मू-काश्मीर पोलिसांकडून हे प्रकरण एआयएकडे सुपूर्द केले जात आहे. हा हल्ला पाकिस्तान समर्थित दहशतवादी संघटना लष्कर-ए-तैयबाने त्यांच्या 'द रेझिस्टन्स फ्रंट' च्या माध्यमातून केल्याचे समोर आले आहे.

अधिकाऱ्यांच्या मते, एनआयए आता जम्मू आणि काश्मीर पोलिसांनी दाखल केलेल्या एफआयआरची पुन्हा नोंदणी करेल आणि औपचारिक तपास सुरू करेल. महत्वाचे म्हणजे, आयजी विजय साखरे यांच्या नेतृत्वाखालील एनआयए टीम २३ एप्रिलपासूनच स्थानिक पोलिसांना मदत करत आहे. या हल्ल्यामागील व्यापक दहशतवादी नेटवर्क आणि कट उलगडण्यासाठी एनआयए लवकरच सखोल तपास सुरू करेल.

गेल्या काही दिवसांपासून एनआयए हल्ल्यातील वाचलेल्यांचे जबाब नोंदवत आहे. तसेच, लष्कर, जैश-ए-मोहम्मद आणि इतर दहशतवादी संघटनांशी संबंधित अटक केलेल्या दहशतवादी आणि स्थानिकांचीही चौकशी केली जात आहे. तर, तिकडे लष्कर, सीआरपीएफ आणि जम्मू-काश्मीर पोलिसांचे संयुक्त पथक २६ निष्पाप पर्यटकांना ठार मारणाऱ्या दहशतवाद्यांचा शोध घेत आहे.

भारतीय गुप्तचर संस्थांनी पाकिस्तानातील मुझफ्फराबाद आणि कराची येथील सेफ हाउसमध्ये हल्ल्याचे डिजिटल पुरावे शोधले आहेत, ज्यामुळे हल्ल्यात पाकिस्तानचा थेट सहभाग असल्याची पुष्टी झाली आहे. हा हल्ला देखील मुंबई २६/११ स्टाईल कंट्रोल-रूम ऑपरेशनच्या धर्तीवर करण्यात आला असल्याचे मानले जाते. फॉरेन्सिक विश्लेषण आणि प्रत्यक्षदर्शींच्या अहवालांवरून असे दिसून आले आहे की, हा हल्ला ४-५ दहशतवाद्यांनी केला. ते सर्वजण अत्याधुनिक शस्त्रांनी सुसज्ज होते. आता एनआयए या घटनेचा विविध बाजूंनी तपास करणार आहे.

# दहशतवादाविरुद्धची कारवाई तीव्र
## 10 घरे उद्ध्वस्त; 175 संशयित ताब्यात



**श्रीनगर, दि. २७ वृत्तसंस्था**

जम्मू आणि काश्मीरमधील कुपवाडा जिल्ह्यात अज्ञात बंदूकधाऱ्यांनी गोळ्या झाडून हल्ला केलेल्या एका सामाजिक कार्यकर्त्याचा रविवारी मृत्यू झाला. पोलिसांनी सांगितले की, शनिवारी कांदिखास परिसरात घरसूल मगरे नावाने ओळखल्या जाणाऱ्या ४५ वर्षीय नागरिकाची त्याच्या घराजवळ अज्ञात बंदूकधाऱ्यांनी गोळ्या घालून हत्या केली.

मगरे यांच्या पोटात आणि डाव्या मनगटात गोळी लागली, त्यांना तातडीने हंडवाडा रुग्णालयात दाखल केले, तिथे उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. मृत सामाजिक कार्यकर्त्याचा राजकीय संबंध माहित नाही आणि पोलीस नागरिकाच्या हत्येमागील नेमकी कारणे शोधण्याचा प्रयत्न करत आहेत.

दरम्यान, दहशतवाद्यांवर आणि दहशतवाद्यांशी संबंध असलेल्यांविरुद्ध मोठ्या प्रमाणात कारवाई सुरू ठेवत, सुरक्षा दलांनी बांदीपोरा जिल्ह्यातील छोटीपोरा गावात एका दहशतवाद्याचे आणखी एक घर उद्ध्वस्त केले. ज्या दहशतवाद्यांची घरे पाडण्यात आली आहेत त्यात लष्कर-ए-तोयबाचे दहशतवादी आहेत.

आदिल हुसैन ठोकर, झाकीर अहमद गनई, अमीर अहमद दार आणि आसिफ शेख, शाहिद अहमद कुट्टे, अहसान उल हक अमीर, जैश-ए-मोहम्मदचे अमीर नजीर वानी, जमील अहमद शेर गोजरी, अदनान साफी दार आणि द रेझिस्टन्स फ्रंटचे फारुख अहमद टेडवा. सुरक्षा अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, अहसान उल हकने २०१८ मध्ये पाकिस्तानमध्ये प्रशिक्षण घेतले आणि अलीकडेच तो खोऱ्यात 'घुसखोरी' करत होता.

लष्कर-ए-तोयबाचा कमांडर शाहिद अहमद कुट्टे हा अनेक देशविरोधी कारवायांमध्ये सहभागी आहे, झाकीर अहमद घनी पण अनेक कारवायांमध्ये सहभागी आहे. फारुख अहमद तेडवा पाकिस्तानमधून काम करत होता. मंगळवारी झालेल्या हल्ल्यात ठोकरचा थेट हात असल्याचा संशय आहे.

**१० दहशतवाद्यांची घरे उद्ध्वस्त**

जम्मू आणि काश्मीरमधील दहशतवादी नेटवर्क उध्वस्त करण्यासाठी ही कारवाई केली आहे. २२ एप्रिल रोजी पहलगामच्या बैसरन मैदानावर झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर आतापर्यंत काश्मीरमध्ये दहशतवाद्यांची १० घरे पाडण्यात आली आहेत. या हल्ल्यात २६ जणांचा मृत्यू झाला.

# दोषींना सोडणार नाही, पीडितांना न्याय देणारच: पंतप्रधान



**नवी दिल्ली, दि. २७ वृत्तसंस्था**

दहशतवाद्यांना काश्मीर पुन्हा उद्ध्वस्त करायचे आहे. या कठीण काळात १४० कोटी देशवासीयांची एकता हा सर्वात मोठा आधार आहे. पहलगाम हल्ल्यातील दोषींना सोडणार नाही, पीडित कुटुंबांना न्याय मिळेल, असे आश्वासन देत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'मन की बात' कार्यक्रमात पुन्हा एकदा पहलगाम हल्ल्याबद्दल दुःख व्यक्त केले. 'मन की बात' या त्यांच्या कार्यक्रमाचा हा १२१ वा भाग आहे.

पहलगाम घटनेने देशवासीयांना दुखावले आहे आणि याबद्दल देशवासीयांच्या मनात खोल वेदना आहेत. पीडितांच्या कुटुंबियांचे दुःख लोक समजू शकतात. दहशतवाद्यांचे फोटो पाहून प्रत्येक भारतीयाचे रक्त खवळले आहे. काश्मीरमध्ये शांतता परतत होती, लोकशाही मजबूत होत होती. पर्यटकांच्या संख्येत अभूतपूर्व वाढ झाली होती. लोकांचे उत्पन्न वाढत होते, परंतु देशाच्या आणि जम्मू-काश्मीरच्या शत्रूंना हे आवडले नाही, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले.

पंतप्रधान मोदी म्हणाले की, "दहशतवाद्यांना काश्मीर पुन्हा उद्ध्वस्त करायचे आहे, म्हणूनच त्यांनी एवढा मोठा कट रचला. दहशतवादाविरुद्धच्या या युद्धात १४० कोटी भारतीयांची एकता ही आपली सर्वात मोठी ताकद आहे. ही एकता दहशतवादाविरुद्धच्या आपल्या निर्णायक लढाईचा आधार आहे. देशासमोरील या आव्हानाला तोंड देण्यासाठी आपल्याला आपला संकल्प बळकट करायचा आहे.भारतातील लोकांमध्ये जो राग आहे तो जगभर जाणवत आहे. या हल्ल्याचा जगभरातून तीव्र निषेध केला असून दहशतवादाविरुद्धच्या लढाईत संपूर्ण जग भारतासोबत उभे आहे. मी पीडित कुटुंबांना आश्वासन देतो की त्यांना न्याय मिळेलच. या हल्ल्यातील दोषींना सर्वात कठोर उत्तर दिले जाईल."

मन की बातच्या १२१ व्या भागात पंतप्रधान मोदी पुढे म्हणाले की, 'एक पेड माँ के नाम' मोहीम आपल्याला जन्म देणाऱ्या आईला आणि पृथ्वी मातेला समर्पित आहे. ५ जून रोजी, जागतिक पर्यावरण दिनानिमित्त या मोहिमेला एक वर्ष पूर्ण होईल. या एका वर्षात, देशभरात १.४ अब्जाहून अधिक झाडे लावण्यात आली आहेत. भारताच्या या उपक्रमाकडे पाहता, परदेशातील लोकांनीही त्यांच्या आईच्या नावाने झाडे लावली आहेत. तुम्हीही या मोहिमेत सामील व्हावे," असे आवाहन त्यांनी केले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी डॉ. के. कस्तुरीरंगन यांना श्रद्धांजली वाहिली. देशाचे नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरण तयार करण्यात कस्तुरीरंगन यांनीही मोठी भूमिका बजावली. २१ व्या शतकाच्या आधुनिक गरजांनुसार भविष्यकालीन शिक्षणाची कल्पना डॉ. कस्तुरीरंगन यांनी मांडली. देशासाठी त्यांची निस्वार्थ सेवा आणि राष्ट्र उभारणीतील त्यांचे योगदान नेहमीच लक्षात ठेवले जाईल, असे ते म्हणाले.

# पाकिस्तानी नागरिक बेपत्ता होण्याच्या अफवा निराधार - मुख्यमंत्री फडणवीस

**पुणे, दि. २७ प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गृहमंत्री या नात्याने १०७ पाकिस्तानी नागरिक बेपत्ता होण्याच्या अफवा 'या' पूर्णपणे निराधार असल्याचे स्पष्ट केले आहे. ते पुणे येथे माध्यमांशी आज संवाद साधत होते.

पुढे बोलताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, "गृहमंत्री म्हणून मी स्पष्टपणे सर्वांना सांगू इच्छितो की, या संदर्भातील अफवा पसरवू नयेत. सर्व पाकिस्तानी नागरिकांचे ठावठिकाण आम्ही शोधून काढले आहे आणि त्यांना महाराष्ट्रातून त्यांच्या देशात परत पाठविण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे."

ते पुढे म्हणाले, "योग्य त्या सर्व व्यवस्था करण्यात येत असून, कोणताही पाकिस्तानी नागरिक येथे थांबणार नाही. माझा अंदाज आहे की, आज संध्याकाळपर्यंत किंवा उद्याच्या सकाळपर्यंत सर्वजण भारतातून परत जातील. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या स्पष्टीकरणानंतर नागरिकांमध्ये पसरलेल्या संभ्रमाला पूर्णविराम मिळाला असून, प्रशासनाकडूनही अधिकृत हालचालींना गती देण्यात आली असल्याचे देखील ते म्हणाले".

दरम्यन, देशाचे गृहमंत्री अमित शाह यांनी सांगितलं आहे की, पाकिस्तानी नागरिकांनी तत्काळ देश सोडावा. महाराष्ट्रात देखील ज्यांची नोंद झाली त्यांनी देश सोडावा, असे फर्मान सरकारने काढले आहे. मुख्यमंत्र्यांनी देखील इशारा दिलेला आहे. तर, मी सुद्धा भाषणात बोललो की, १०७ लोकं जे कुठे लपले असतील त्यांना पोलीस शोधतील आणि तिथेच ठोकतील, अशा शब्दात महाराष्ट्रात असलेल्या पाकिस्तानी नागरिकांना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी थेट इशाराच दिला आहे.

आता पाकिस्तानला दयामाया दाखवण्याचा कारण नाही. जे आश्रय देतील त्यांना देखील सोडले जाणार नाही. म्हणून पाकिस्तानी नागरिकांनी तत्काळ देश सोडून निघून जावं, अशी भूमिका एकनाथ शिंदे यांनी बोलून दाखवली. तसेच, काश्मीरच्या पहलगाम येथील हल्ला दुर्दैवी होता. त्या ठिकाणी जाणे हे माझं कर्तव्य होतं. मात्र, त्यातही विरोधक राजकारण करतात, असेही शिंदेंनी म्हटले.

## विदर्भ मराठवाड्यात वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाचा अलर्ट

**पुणे, दि. २७ प्रतिनिधी**

गेल्या अनेक दिवसांपासून राज्यात हवामानात टोकाचे बदल होत आहेत. एकीकडे तापमानाचा वाढता पारा तर दुसरीकडे अवकाळी पावसाचा अलर्ट देण्यात आल्यामुळे नागरिक हैराण झाले आहेत. राज्यात प्रचंड उकाडा वाढला आहे. आज हवामान विभागाने विदर्भ मराठवाडा व मध्य महाराष्ट्रात बहुतांश ठिकाणी अवकाळी पावसाची शक्यता आहे. अमरावती, यवतमाळ, चंद्रपूर, गडचिरोली या चार जिल्ह्यांना पावसाचा ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे . येत्या चार दिवसात अवकाळी पावसासह उष्णतेच्या लाटेचे ही अलर्ट आहेत.

अमरावती, यवतमाळ, चंद्रपूर, गडचिरोली जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे.

वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, बुलढाणा, अकोला, वाशिम, हिंगोली, परभणी, नांदेड, बीड ,लातूर, धाराशिव, सोलापूर ,सांगली, कोल्हापूर या जिल्ह्यांना अवकाळी पावसाचा यलो अलर्ट आहे.

सिंधुदुर्ग, सातारा, पुणे, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर आणि जालना जिल्ह्यात अलर्ट नसला तरी पावसाचा इशारा आहे.

हवामान विभागाचे पुणे विभागाचे तज्ञ, के. एस होसाळीकर यांनी ट्विट करत येत्या आठवड्यातील हवामानाची माहिती दिली आहे.

## पाकिस्तानचे पाणी बंद केले नाही सरकार खोटे बोलतेय - प्रकाश आंबेडकर

**शिर्डी, दि.२७ प्रतिनिधी**

पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदींसोबत गृहमंत्री अमित शाह, संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांच्यासह वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक झाली. त्यानंतर, भारताने पाकिस्तानची कोंडी करणारे ५ महत्त्वाचे निर्णय घेतले. त्यामध्ये, पाकिस्तानची पाणी कोंडी करत सिंधू जल वाटप कराराला स्थगिती दिल्याचे सांगण्यात आले. मात्र, २४ एप्रिल रोजी केंद्रीय सचिवांनी पाकिस्तानला लिहिलेल्या पत्राचा दाखला देत वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी सरकारच्या भूमिकेवर प्रश्न उपस्थित केले आहेत. भारताने पाकिस्तानचं पाणी बंद केलेलं नाही, सरकार खोटं बोलतंय, दिशाभूल करतय, असे प्रकाश आंबेडकर यांनी म्हटलं आहे.

पहलगाम हल्ल्यानंतर केंद्र सरकारने पाकिस्तानी नागरिकांना भारत देश सोडण्याचे आदेश दिले आहेत. तसेच, अटारी वाघा बॉर्डर १ मे पर्यंत बंद ठेवण्याचा निर्णय देखील घेण्यात आला आहे. यासोबतच, सिंधू जल वाटप कराराला स्थगिती दिल्याचे सांगण्यात आले. मात्र, हा करार रद्द केल्याचं खोटे सांगितले जातय, असे प्रकाश आंबेडकर यांनी म्हटले. पाकिस्तानला पाणी बंद केल्यासंदर्भाने दिलेलं पत्रच त्यांनी दाखवलं. या पत्रामध्ये कुठेही पाणी बंद केल्याचा उल्लेख नाही. धरणातलं पाणी आम्ही सोडणार नाही, असा कुठेही उल्लेख नाही. याचाच अर्थ इंडस करार भारत सरकारने रद्द केलेला नाही, असे प्रकाश आंबेडकर यांनी म्हटले. माझ्या भाषेत नरोवा कुंजरोवा आणि कायद्याच्या भाषेत स्टेटस्को अस हे पत्र. त्यामुळे जनतेला हे पत्र दाखवलं तर सरकार कुठल्या प्रकारची कारवाई करतंय हे समोर येईल. हा गंभीर मुद्दा असून शासनाने याकडे डोळे झाक करू नये. या सगळ्यात फक्त पाकिस्तानी नागरिकांचा भुसार रद्द करून त्यांना बाहेर काढता येत आहे, एवढीच वस्तूस्थिती असल्याचेही आंबेडकर यांनी म्हटले.

सिंधू जल कराराबाबत बोलताना आंबेडकर म्हणाले की, कोणताही करारनामा लगेच रद्द करता येत नाही, त्याच्यासाठी किंमत मोजावी लागते. पण मी म्हणतो भाडमध्ये गेलं ते रद्द केलाय तर केला रद्द. मात्र, त्याची फॉलोअप ॲक्शन घ्या ना. जे समोर आले त्यात धरणातील गाळ काढणार, पाणी अडवणार याला १० वर्षे लागतील, असेही आंबेडकर यांनी म्हटले.

# पाकिस्तान औषध टंचाईच्या उंबरठ्यावर

**इस्लामाबाद, दि. २७ वृत्तसंस्था**

पहलगाम हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानशी व्यापार थांबवण्याचा निर्णय घेतल्यानंतर पाकिस्तानच्या आरोग्य अधिकाऱ्यांनी औषधांचा पुरवठा सुरळित करण्यासाठी "आपत्कालीन तयारी" सुरू केल्याचे वृत्त आहे.

भारताने सिंधू जल करार थांबवल्यानंतर प्रतिक्रिया म्हणून पाकिस्तानने गुरुवारी भारतासोबतचा सर्व व्यापार स्थगित केला.

पण त्यामुळे पाकिस्तानने स्वतःच्याच पायावर दगड मारून घेतला आहे. पाकिस्तान औषध पुरवठ्यासाठी भारतावर अवलंबून आहे. आणि आता औषधांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी पाकिस्तानने काही तत्काळ उपाययोजना केल्या असून, तेथील आरोग्य यंत्रणांनी "आपत्कालीन तयारी" सुरू केली आहे.

ड्रग रेग्युलेटरी अथॉरिटी ऑफ पाकिस्तानच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, जरी औषध क्षेत्रावर बंदीचा अधिकृत आदेश आलेला नसला तरी तयारीसाठी योजनेची अंमलबजावणी सुरू झाली आहे.


२०१९च्या संकटानंतर आम्ही अशा आपत्कालीन परिस्थितींसाठी तयारी सुरू केली होती. आता आम्ही आमच्या औषध गरजा भागवण्यासाठी पर्यायी स्रोतांचा सक्रियपणे शोध घेत आहोत."

सध्या पाकिस्तान औषधांसाठी लागणारा ३० ते ४० टक्के कच्चामाल, ज्यामध्ये API (ॲक्टिव्ह फार्मास्युटिकल इंग्रेडियंट्स) आणि इतर प्रगत उपचार उत्पादने यांचा समावेश आहे याबाबत भारतावर अवलंबून आहे.

या पुरवठा साखळीत व्यत्यय आल्याने DRAP आता चीन, रशिया आणि युरोपमधील इतर देशांकडून पर्यायी पुरवठ्याचा शोध घेत आहे.

## शिंदेंवर टीका करणाऱ्या रोहिणी खडसेंना ज्योती वाघमारेंचे प्रत्युत्तर

**मुंबई, दि. २७ प्रतिनिधी**



पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काश्मीरमध्ये अडकलेल्या महाराष्ट्रातील पर्यटकांना आवश्यक ती मदत पुरवली. यावरून शिवसेना शिंदे गटाचे खासदार नरेश म्हस्के यांनी जे लोक कधीही विमानात बसले नाहीत. त्यांना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विमानात बसवून आणलं, असे वादग्रस्त वक्तव्य केले होते. यावरून राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या महिला प्रदेशाध्यक्ष रोहिणी खडसे यांनी जोरदार हल्लाबोल केला होता. एकनाथ शिंदे यांना उपमुख्यमंत्री पदावर बसवून महाराष्ट्रातील जनतेने उपकार केले आहेत. त्यामुळे अशा वक्तव्याने जनता तुम्हाला खुर्ची सोडायला भाग पाडेल हे विसरू नका, असे त्यांनी म्हटले होते. आता रोहिणी खडसे यांच्या टीकेवर शिवसेना शिंदे गटाच्या प्रवक्ता ज्योती वाघमारे यांनी जोरदार पलटवार केलाय.

शिवसेना प्रवक्ता ज्योती वाघमारे म्हणाल्या की, रोहिणी खडसे यांची मला दया येते. रोहिणी ताई तुमचा आवाका किती? तुमची बुद्धी किती आणि तुम्ही बोलता किती? बापाच्या पुण्याईवर तुम्ही राजकारणात तग धरून आहात. एकनाथ खडसे यांनी जाहीरपणे सांगितलं होतं की, एकनाथ शिंदे यांनी विमान पाठवलं नसतं तर माझं विमान कधीच स्वर्गात उडालं असतं. रोहिणीताई एकनाथ शिंदे साहेबांनी पाठवलेलं विमान किंवा एअर ॲम्बुलन्स एकनाथ खडसे यांचा प्राण वाचवतो. आपल्या वडिलांचे प्राण वाचवणाऱ्या एकनाथ शिंदे यांच्याबद्दल बोलणे आपल्या संस्कारात बसते का? असे म्हणत त्यांनी रोहिणी खडसे यांच्यावर निशाणा साधलाय.

# लाडक्या बहिणींना २१०० रुपये देऊ असे कुणीच म्हटले नाही - मंत्री नरहरी झिरवाळ

**जळगाव, दि. २७ वृत्तसंस्था**



राज्यात यंदाच्या विधानसभा निवडणुकांपूर्वी सुरू करण्यात आलेली मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना गेमचेंजर ठरली. या योजनेतून महिलांना दरमहा १५०० रुपये देण्यात येत असून निवडणुकांच्या जाहीरनाम्यात पुन्हा महायुतीचं सरकार आल्यास लाभार्थी महिलांना २१०० रुपये देण्याचं आश्वानस सरकारने दिलं होतं. मात्र, अद्यापही महिलांना १५०० रुपयेच दिले जातात. तर, २१०० रुपये कधी द्यायचे ते आर्थिक बजेट पाहून निर्णय घेऊ असे अर्थमंत्री अजित पवार यांनी यापूर्वी म्हटलं होतं. तर, आता राज्याचे कॅबिनेटमंत्री नरहरी झिरवाळ यांनी २१०० रुपये देण्यासंदर्भात मोठं वक्तव्य केलं आहे. 'लाडक्या बहिणींना २१०० रुपये देऊ असं कुणीच म्हंटलं नाही', असे म्हणत झिरवाळ यांनी चक्क २१०० रुपये देण्यावरुन घुमजाव केला आहे.

लाडकी बहिण योजनेचा एप्रिल महिन्यातील हफ्ता कधी जमा होणार, याची प्रतिक्षा सध्या लाडक्या बहिणींना आहे. तसेच, १५०० रुपयांचे २१०० कधी होणार याची देखील उत्सुकता आहे. मात्र, लाडक्या बहिणींच्या हप्त्यावरुन सत्ताधाऱ्यांची टोलवाटोलवी सुरूच असल्याचं पाहायला मिळत आहे. 'लाडक्या बहिणींना २१०० रुपये देऊ असं कुणीच म्हंटलं नाही', असे अन्न आणि औषध प्रशासनमंत्री नरहरी झिरवाळयांनी म्हटलंय. विरोधकांनीच २१०० रुपयांवर जोर लावलाय. लाडक्या बहिणींना १५०० रुपयेही पुरेसे आहेत, त्या खूश आहेत, असे म्हणत झिरवाळयांनी २१०० रुपये देण्यावरुन पलटी मारल्याचं दिसून येत आहे.

लाडकी बहीण योजना विधानसभा निवडणुकीत महायुतीसाठी गेमचेंजर ठरली. महायुतीचे घटक पक्ष भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या विजयामध्ये या योजनेचा वाटा महत्त्वाचा ठरला. कारण, महायुतीचं सरकार आल्यास लाडक्या बहिणींना दरमहा २१०० रुपये देऊ, असं आश्वासन देण्यात आलं होत. मात्र, महायुती सरकार पुन्हा सत्तेत येऊन देखील लाडक्या बहिणींच्या हप्त्यामध्ये पुन्हा वाढ न करण्यात आल्यानं विरोधकांकडून सवाल उपस्थित करण्यात येत आहेत. त्यावर जाहीरनामा पाच वर्षांसाठी असतो, असं उत्तर सत्ताधाऱ्यांकडून देण्यात आलं आहे. मात्र, आता तर १५०० रुपयांत लाडक्या बहिणी खुश आहेत, २१०० देऊ असं म्हटलेच नसल्याचे राज्य सरकारमधील मंत्री झिरवाळयांनी म्हटलं आहे.

# "पोलिसांचा मला अनुभव आला तो मांडला, तरी दिलगिरी व्यक्त करतो"- वादग्रस्त वक्तव्य करुन संजय गायकवाडांचा माफीनामा

**मुंबई, दि. २७ प्रतिनिधी**

शिवसेना शिंदे गटाचे बुलढाण्याचे आमदार संजय गायकवाड यांनी दोन दिवसांपूर्वी पोलिसाविरुद्ध आक्षेपार्ह विधान केले होते. मात्र आता पोलिसांविषयी वादग्रस्त वक्तव्य करणे आमदार संजय गायकवाड यांना चांगलेच महागात पडले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याची दखल घेतल्यानंतर संजय गायकवाड यांच्या विरोधात गुन्हा दाखल झाला. त्यानंतर आता संजय गायकवाड यांनी महाराष्ट्र पोलिसांची माफी मागितली आहे. माझा हेतू पोलिसांचे धैर्य खचवण्याचा नव्हता असे संजय गायकवाड यांनी म्हटलं.

आमदार संजय गायकवाड यांनी शुक्रवारी महाराष्ट्र पोलिसांबद्दल आक्षेपार्ह वक्तव्य केले होते. पोलिसां इतके अकार्यक्षम डिपार्टमेंट महाराष्ट्र आणि भारत सोडून जगात कुठेच नाही असं म्हणत गायकवाड यांनी पोलिसांच्या कार्यक्षमतेवरच प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते. त्यानंतर मुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणीस यांनी गायकवाड यांच्या वक्तव्याची दखल घेत एकनाथ शिंदे यांना कडक समज द्यायला सांगितले. त्यानंतर आता संजय गायकवाड यांनी दिलगिरी व्यक्त केली आहे.



"माझं वक्तव्य महाराष्ट्रातल्या संपूर्ण पोलिसांचे धैर्य खचवणे, त्यांच्या धाडसाचा आणि पराक्रमाचा अपमान करण्याकरता नव्हते. जे अनुभव मला आले होते ते मी त्या ठिकाणी मांडले. माझ्या शब्दामुळे महाराष्ट्रातल्या पोलिसांची किंवा महाराष्ट्र सरकारची नाचक्की होत असेल तर मी महाराष्ट्र पोलिसांची जाहीर दिलगिरी व्यक्त करतो. पण मी जे काही वक्तव्य केलं ते अनुभवले आहे. माझ्या परिवारासोबत तसे झाले आहे. त्यामुळे मी तसे बोललो होतो," असे संजय गायकवाड म्हणाले. मात्र मी स्थानिक पोलिसांवर ताशेरे ओढले होते आणि त्याबाबत मी ठाम आहे, असेही संजय गयकवाड यांनी म्हटलं.

"पोलिसांच्या इतके अकार्यक्षम डिपार्टमेंट महाराष्ट्र आणि भारत सोडून जगात कुठेच नाही. सरकारने गुटखाबंदी केली की पोलिसांचा एक हप्ता वाढतो, एखादा कठोर कायदा केला की एक हप्ता वाढतो. पोलिसांनी एखाद्या कारवाईत ५० लाख पकडले की ५० हजार दाखवतात. पोलिसांनी इमानदारपणे काम केले तर जगातली सगळी गंदगी खतम होऊ शकते," असं विधान गायकवाड यांनी केले होते.

"उपमुख्यमंत्री शिंदे यांच्याशी बोलणार आहे. आमदार गायकवाड यांना कडक समज देण्यास सांगणार आहे. वारंवार असे चालणार नाही. हे योग्य नाही. मात्र, त्यानंतरही ते बोलतच असतील तर त्यांच्यावर कारवाई केली जाईल," असा इशारा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिला.

## महत्त्वाचे

### सटाणा येथे घरफोडी; सोने, रोख रक्कम चोरीला!



**सटाणा ।** शहरातील चौगाव रोड येथील सप्तश्रुंगी कॉलनीत बंद घराच्या दरवाजाचे कुलूप तोडून सोन्याचे दागिने व रोख रक्कम असा सुमारे तीन लाख चोवीस हजारांचा ऐवज चोरून नेल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी सटाणा पोलीसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नरेंद्र भाऊराव मोरे हे आपल्या घराला कुलूप लावुन कुटूंबासमवेत आघार येथे गेले होते. या घरावर चोरट्यांनी पाळत ठेवत घरी कुणी नसल्याचे पाहून दरवाजाचे कुलूप तोडून आत प्रवेश करत घरातील लोखंडी कपाटाचे लॉकर तोडून त्यामध्ये ठेवलेली अडीच तोळे सोन्याची मंगल पोत, सोन्याचे कॉइन, अंगठी व दुसऱ्या रूममध्ये कपाटात ठेवलेली रोख रक्कम दिड लाख रुपये असा एकूण तीन लाख चोवीस हजारांचा ऐवज चोरट्यांनी चोरून नेला आहे. याप्रकरणी सटाणा पोलीसांत गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस उपनिरीक्षक अतुल बोरसे पुढील तपास करीत आहेत.

### बाळासाहेब सोनवणे यांना समाजरत्न पुरस्कार जाहीर



**नाशिक ।** निफाड तालुक्यातील मांजरगाव येथील भूमिपुत्र, महाराष्ट्र राज्य अपंग कर्मचारी अधिकारी संघटनेचे विभागीय अध्यक्ष तसेच महिरावणी येथील मातोश्री गि.दे.पाटील माध्यमिक विद्यालयाचे शिक्षक म्हणून बाळासाहेब सोनवणे यांना समाजरत्न पुरस्कार जाहीर झाला आहे. त्यांच्या शैक्षणिक, सामाजिक,धार्मिक,दिव्यांग आदी क्षेत्रातील योगदानाबद्दल नाशिक येथील मनु मानसी महिला बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्यावतीने १ मे महाराष्ट्र आणि कामगार दिनानिमित्त "समाज रत्न" पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे. शिक्षकांबरोबरच महाराष्ट्र राज्य दिव्यांग संघटनेच्या माध्यमातून दिव्यांग कर्मचारी तसेच बेरोजगार यांना शासनाच्यावतीने सवलती मिळवून देत २५ वर्षापासून पुनर्वसन करण्याचे काम करत आहे. डॉ.एपीजे अब्दुल कलाम इंटरनॅशनल फाउंडेशनच्यावतीने जिल्हासमन्वयक म्हणून विद्यार्थी बालवैज्ञानिक बरोबरच मुलांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण करत आहे. बहुआयामी व्यक्तिमत्व असलेल्या सोनवणे यांच्या विविध क्षेत्रातील योगदानाबद्दल म्हणून मनु मानसी संस्थेने सोनवणे यांना 'समाज रत्न' पुरस्कार जाहीर केला असून, सर्वच क्षेत्रातून कौतुक होत आहे.

### गोपीनाथजी मुंडे अभियांत्रिकी महाविद्यालयात कार्यशाळा

**नाशिक ।** येथील के .व्ही.एन. नाईक शिक्षण संस्थेच्या लोकनेते गोपीनाथजी मुंडे अभियांत्रिकी महाविद्यलयात ए.आय व जनरेटीव मॉडेल्स या विषयावर २१ एप्रिल ते २५ एप्रिल २०२५ दरम्यान राज्यस्तरीय कार्यशाळेंचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात १५० हून अधिक शिक्षकांनी सहभाग घेतला, ज्यात ए.आय आणि जनरेटिव्ह मॉडेल्स चे शैक्षणिक , व्यावसायिक, औद्योगिक क्षेत्रातील महत्व यावर सविस्तर चर्चा झाली. कार्यक्रमाच्या उदघाटन सत्रात प्रमुख वक्ते म्हणून पुणे विद्यापीठाच्या सायन्स अँड टेक्नोलोंजी विभागाचे डीन डॉ.प्रमोद पाटील सर उपस्थित होते. डॉ.पाटील यांनी आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या तंत्रज्ञानावर प्रकाश टाकला. तसेच या तंत्रज्ञानाच्या शैक्षणिक वापराचे विविध पैलू सुस्पष्टपणे स्पष्ट केले आणि जनरेटिव्ह मॉडेल्स टूल्सचा शिक्षकांच्या कामकाजात कसा उपयोग होईल यावर मार्गदर्शन केले. इतर सत्रात डॉ. परीक्षित महल्ले, डॉ.प्रमोद बिडे, कल्याण दाणी, योगेश जाधव, स्वप्नील पवार यांनी आर्टिफिशिअल इण्टेलिजन्स तंत्रज्ञानाच्या विविध पैलूंवर सविस्तर मार्गदर्शन केले. संस्थेचे अध्यक्ष कोंडाजी आव्हाड उपाध्यक्ष उदय घुगे, सरचिटणीस हेमंत धात्रक, सहचिटणीस दिगंबर गिते यांच्यासह विश्वस्त व संचालक यांनी कार्यशाळेला शुभेच्छा दिल्या. प्राचार्य डॉ. के.व्ही. चंद्रात्रे यांनी या कार्यक्रमाचे महत्व स्पष्ट केले. कार्यशाळेचे नियोजन डॉ. विशाल पाटील आणि डॉ.बाजीराव शिरोळे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ.एच. आर. कुलकर्णी, डॉ.आर.आर. चकुले, डॉ सारिका पाटील डॉ.डी.एस. पाटील, डॉ. योगेश पवार, डॉ.बाविस्कर आणि प्रा.श्रीकांत पवार यांनी परिश्रम घेतले.

### रागिणी पिंगटे यांचे निधन



**पिंपळगाव बसवंत ।** येथील उद्योजक सूनील जगन्नाथ आकडे यांच्या भगिनी रागिणी सुरेश पिंगटे (वय ६२) यांचे प्रदिर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, एक मुलगा, तीन मुली, नातवंडे असा परिवार आहे. येथील सुरेश पिंगटे यांच्या त्या पत्नी तर सिध्दू पिंगटे यांच्या मातोश्री होत.

## चांगल्या सवयींतून लिव्हरचे आजार ठेवा दूर : डॉ. बोरसे



**नाशिक ।** जागतिक लिव्हर दिनाचे औचित्य साधून अॅपेक्स वेलनेस हॉस्पिटल आणि लोकज्योती ज्येष्ठ नागरिक मंच यांच्या संयुक्त विद्यमाने कॉलेजरोडवरील गुरुदक्षिणा सभागृहात भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात 'निरामय जीवनाची सुरुवात निरोगी लिव्हर पासून' याबाबत डॉ. नितीन बोरसे यांनी अतिशय महत्वाची माहिती दिली.

सुप्रसिद्ध आरजे भूषण यांच्या हलक्याफुलक्या संवादशैलीत सत्राचे संचालन झाले. यावेळी डॉ. नितीन बोरसे यांनी लिव्हर स्वास्थ्य व जीवनशैलीतील विविध विकारांबाबत सखोल मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आयएमए नाशिकचे अध्यक्ष डॉ.निलेश निकम यांच्या हस्ते ज्येष्ठांकरिता 'आरोग्यसाथी प्रिव्हिलेज कार्ड'चे अनावरण करण्यात आले. हॉस्पिटलचे संचालक डॉ.शैलेश बोंदर्डे, डॉ. नूतन बोंदर्डे, डॉ प्रतिभा बोरसे, उषा बोंदर्डे, बी. व्ही कापडणीस आदी उपस्थित होते.

यावेळी बोलतांना डॉ. बोरसे यांनी लिव्हरच्या आरोग्याबाबत अनेक गैरसमज दूर करत आरोग्यपूर्ण जीवनासाठी लिव्हरची काळजी कशी घ्यावी, यावर भर दिला. लिव्हर हा आपल्या शरीरातील सर्वांत मोठा अवयव असून ५०० पेक्षा जास्त जबाबदाऱ्या अविरत पार पाडत असतो. यात रक्तातील विषारी पदार्थ शरीराबाहेर टाकणे, पोषणतत्त्वांना ऊर्जेत रूपांतरित करणे, पित्तनिर्मिती, पोषक द्रव्यांची साठवण आणि विनिमय करणे रोगप्रतिकारशक्ती वाढवणे अश्या जबाबदाऱ्या पार पडत असते. लिव्हरच्या आजारांत हेपेटायटिस, चरबीयुक्त लिव्हर, लिव्हर सिर्होसिस, लिव्हर कॅन्सर आणि जिनेटिक लिव्हर आजार ह्यांचा समावेश होतो आणि ह्याला कारणीभूत असणारे घटक जसे मद्यपान, लठ्ठपणा, जंक फूडचे अतिरिक्त सेवन, व्हायरस संसर्ग, गुणसूत्रातील दोष, औषधांचे अनावश्यक सेवन आणि असंतुलित जीवनशैली हे आहेत. यकृताच्या चांगल्या आरोग्यासाठी संतुलित आहार, नियमित व्यायाम आणि मद्यपान तसेच जंक फूडपासून दूर राहणे आवश्यक आहे, तसेच डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय औषधे न घेणे तसेच नियमित तपासणी यकृताच्या आरोग्यासाठी महत्त्वाचे ठरू शकतात. आधुनिक तंत्रज्ञान आणि तज्ञाच्या योग्य मार्गदर्शनाने लिव्हरच्या आजारांवर पूर्ण आणि परिणामकारक उपचार शक्य असल्याचे सांगितले. लोकज्योती ज्येष्ठ नागरिक मंच तर्फे लग्नाच्या सुवर्ण वर्षांचा टप्पा पूर्ण केलेल्या ५० आदर्श जोडप्यांचा सन्मान करण्यात आला, जो उपस्थित सर्वांना प्रेरणादायी ठरला.

कार्यक्रमाची सांगता प्रसिद्ध मराठी अभिनेते संदीप पाठक यांच्या अभिनित आणि संपूर्ण जगभरात गाजलेल्या 'वऱ्हाड निघालय लंडनला' या धमाल विनोद नाटकाच्या शानदार सादरीकरणाने झाली आणि कार्यक्रमाला एक संस्मरणीय आठवण दिली. कार्यक्रमात ८०० हून जास्त नागरिकांनी हजेरी लावत उस्फूर्त प्रतिसाद दिला. अॅपेक्स वेलनेस हॉस्पिटल व लोकज्योती ज्येष्ठ नागरिक मंच यांच्या या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत असून, यापुढेही जनजागृतीसाठी असे उपक्रम सातत्याने राबवले जाणार असल्याचे आयोजकांनी सांगितले. यावेळी लोकज्योती संचालक मंडळाचे रमेश डहाळे, बाळकृष्ण दंडगावकर, देवराम सैंदाणे, जितेंद्र येवले, भा. रा. सुर्यवंशी, विठ्ठल सावंत, डी. एम. कुलकर्णी, प्रकाश महाजन, बापू अमृतकर, उत्तमराव कडलग, विनोद दशपुते, वैशाली पिंगळे आणि अॅपेक्स वेलनेस हॉस्पिटलचे संचालक डॉ. नितीन बोरसे, डॉ. शैलेश बोंदर्डे, सागर देशमुख, डॉ. अजिंक्य देसले, डॉ.अमोल भालेकर, डॉ. एम. एस अहिरे, डॉ. प्रसाद खैरनार, देवेंद्र वाघ, डॉ किशोर बाफना, गिरीश सोनवणे उपस्थित होते.

## वसंत व्याख्यानमालेत जगभरातील दहा विचारवंत यंदा मांडणार विचार

नाशिक । येऊ घातलेल्या 1 मे पासून नाशिकच्या गोदाघाटावर सुरु होणाऱ्या वसंत व्याख्यानमालेच्या 102 व्या वर्षाच्या ज्ञानयज्ञामध्ये जगभरातील 10 विचारवंत आपले विचार मांडणार आहेत. व्याख्यानमालेचे उदघाटकीय पुष्प महाराष्ट्र भूषण डॉ. अभय बंग हे "आरोग्याचे स्वराज्य" या विषयावर गुंफणार आहेत.

विविध फळांची जगभरात निर्यात करून शेतकरी बांधवांना स्वावलंबी बनविणारी सह्याद्री फार्म्स, मोहाडी आणि जागतिक बाजारपेठेत उज्वल नाव मिळविणारा सपट गृप यावर्षीच्या व्याख्यानमालेचे प्रायोजक व सहप्रायोजक आहेत. प्रतिवर्षीप्रमाणे यंदाही दि. 1 मे ते 31 मे रोजी दररोज सायं. 7:15 वाजता देवमामलेदार यशवंत महाराज पटांगण, गोदाघाट, पंचवटी, नाशिक येथे हा ज्ञानयज्ञ आयोजित करण्यात आला आहे. या व्याख्यानमालेचा शुभारंभ नाशिकच्या आयुक्त मनीषा खत्री यांच्या शुभहस्ते करण्यात येणार आहे. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून महसूल आयुक्त प्रवीण गेडाम, पोलीस आयुक्त संदीप कर्णिक, जिल्हाधिकारी जलज शर्मा, विशेष पोलीस महानिरीक्षक दत्तात्रय कराळे, आदिवासी विकास आयुक्त लीना बनसोड, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल, पोलीस अधीक्षक विक्रम देशमाने, शर्मिष्ठा वालावलकर- घारगे, कार्यकारी अभियंता उदय पालवे, एच. ए. एल. चे महाव्यवस्थापक सुब्रत मंडल, सह्याद्री फार्म्सचे चेअरमन विलास शिंदे, सपट उद्योग समूहाचे चेअरमन निखिल जोशी उपस्थित राहणार आहेत. व्याख्यानमालेत जगभरातील 10 मान्यवर आपले विचार मांडणार आहेत. त्यामध्ये अमेरिकेतील तरुण संशोधक आकाश पाटील (7 मे- विचारांच्या क्षितीजापलीकडे : कृत्रिम बुद्धिमत्ता आणि मानवी क्षमतांचा विस्तार), आंतरराष्ट्रीय पर्यावरण तज्ञ डॉ. मेधा ताडपत्रीकर ( 12 मे- प्लास्टिक : वरदान आणि धोका), नुकतेच अमेरिकेत 32 मराठी पदार्थांच्या हॉटेलांची साखळी सुरू करणारे आंतरराष्ट्रीय ख्यातीचे शेफ विष्णू मनोहर (13 मे- आसे घडले विश्वविक्रम आणि मराठी पदार्थांचे जागतिकीकरण), आंतरराष्ट्रीय उद्योग व्यावसायिक तज्ञ माधव दाबके (18 मे- पिरॅमिडच्या तळाशी नवोन्मेष आणि उद्योजकता निर्माण करा), जपान येथील आनंदसागर शिराळकर (19 मे- AI युगात भाषेचे भवितव्य : आपण तंत्रज्ञानाला शिकवणार की तंत्रज्ञान आपल्याला), सुनील कुलकर्णी (20 मे- जपान आणि भारत : उद्योजकतेमागची अंतर्दृष्टी आणि नोकरीच्या संधी), केंद्रीय परराष्ट्र विभागातील अधिकारी डॉ. सुयश चव्हाण (22 मे- प्रशासकीय सेवा परीक्षांची पूर्वतयारी आणि जागतिक स्तरावर भारतीय विद्यार्थ्यांना उपलब्ध असलेल्या संधी), थायलँड येथील अमित वाईकर (25 मे- प्रवासी भारतीयाचे सामाजिक नेतृत्व), अमेरिकेतील पहिले मराठी खासदार श्रीनिवास ठाणेदार (27 मे- प्रकट मुलाखत), ऑर्डर ऑफ ऑस्ट्रेलिया हा सन्माननीय पुरस्कार मिळविणारे डॉ. विजय जोशी (29 मे- मजबूत व गुणवत्तापूर्ण रस्ते आणि महामार्गांची बांधणी) यांचा समावेश आहे. त्याचबरोबर स्वेच्छानिवृत्त आयकर अधिकारी उज्वलकुमार चव्हाण (3 मे- ये ED ED क्या है?), जवाहरलाल नेहरू पोर्ट अथोरिटीचे चेअरमन उन्मेष वाघ (17 मे- वाढवण बंदर : एक कल्पवृक्ष), न्यायाधीश चकोर बाविस्कर (6 मे), साहित्यिक शाहू पाटोळे (8 मे), प्रा. मनोज बोरगांवकर (15 मे), अनिल पाटील (28 मे), शेतीतज्ञ सचिन व समीर अधिकारी (5 मे), अझहर तंबुवाला (23 मे), लेखक, दिग्दर्शक व निर्माते वरुण सुखराज (9 मे ), अर्थतज्ञ निरंजन राजाध्यक्ष (10 मे), डॉ. नंदकिशोर लाड (16 मे), पक्षीतज्ञ किरण पुरंदरे (21 मे), सुप्रसिद्ध खेळाडू व ऑलिम्पिक स्पर्धेतील ज्युरी बिल्किस मीर (24 मे), छायाचित्रकार इंद्रनील बंकापूरे ( 26 मे), व्याख्याते अभय भंडारी (14 मे), सुनील देवधर (30 मे), युवा शाहीर सुरज राऊळ (2 मे) हे मान्यवर आपले विचार मांडणार आहेत. दि. 4 मे रोजी आगामी सिंहस्थ कुंभमेळ्यावर परिसंवाद आयोजित करण्यात आला आहे. महसूल आयुक्त डॉ. प्रविण गेडाम व सहकारी अधिकारी त्यामध्ये सहभागी होणार आहेत. 1000 कोटी रुपयांच्या वार्षिक उलाढालीकडे वाटचाल करणाऱ्या नाशिकच्या आनंद ॲग्रो उद्योग समूहाचे चेअरमन उद्धव आहिरे 11 मे रोजी उद्यमशिलतेची पेरणी : यशाचे पीक या विषयावर बोलणार आहेत. या व्याख्यानमालेचा समारोप दि. 31 मे रोजी झी मराठी प्रस्तुत उत्सव नात्यांचा- उत्सव झी मराठीचा या कार्यक्रमाने होणार आहे. या कार्यक्रमात झी मराठी वाहिनीवरील सिरिअलमधील कलाकार, गायक, नृत्यकलाकार व सेलिब्रिटी निवेदक सहभागी होणार आहेत. दररोज व्याख्यानानंतर नाशिकमधील विविध कलाकारांचे गृप गाणी व नृत्यांचे सादरीकरण करणार आहेत. या सर्व कार्यक्रमांचे थेट प्रक्षेपण केबल टीव्ही तसेच समाज माध्यमांवर करण्यात येणार आहेत. कार्यक्रमास नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन व्याख्यानमालेच्या कार्यकारी मंडळाने केले आहे.

**महाराष्ट्रभूषण डॉ. अभय बंग उदघाटकीय पुष्प गुंफणार**

## पहलगाम हल्ल्याचा निषेध: नाशिकमध्ये पाकिस्तानचा झेंडा, अतिरेक्यांचे फोटो जाळून संतप्त आंदोलन

**नाशिक ।** काश्मीरमधील पहलगाम येथे हिंदूंवर टार्गेट करून करण्यात आलेल्या अमानवी दहशतवादी हल्ल्याचा तीव्र निषेध नोंदवण्यासाठी आज संध्याकाळी नाशिकमधील रविवार कारंजा येथे हिंदू एकता आंदोलन पक्षातर्फे जोरदार आंदोलन करण्यात आले.

यावेळी संतप्त कार्यकर्त्यांनी "भारत माता की जय", "वंदे मातरम", "पाकिस्तान मुर्दाबाद", "एक धक्का और दो, पाकिस्तान तोड़ दो", "बदला लो, बदला लो", "जला दो, जला दो पाकिस्तान जला दो" अशा प्रखर राष्ट्रवादी घोषणा दिल्या. आंदोलनादरम्यान पाकिस्तानचा ध्वज तसेच दहशतवाद्यांचे फोटो जाळून संतप्त प्रतिक्रिया व्यक्त करण्यात आली. या आंदोलनात हिंदू एकता आंदोलन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष रामसिंग बावरी, जिल्हाध्यक्ष किशोर बागमार, शहराध्यक्ष किरणसिंग पवार, कालीचरण महाराज, प्रसाद बावरी, प्रियांका अहिरराव, adv श्रीकांत पाटील, कल्याणसिंह परदेशी, मनोज मराठे, उमेश पाटील, राजेंद्र समशेर, नितीन खैरनार, प्रताप पवार, अनिल जाधव, राजेश धुमाळ, रोहन पवार, मोहन पवार, किरण कळसकर, अविनाश शिंदे, सोमनाथ यंदे, विजय राख, दिलीप क्षीरसागर, मिथुन परदेशी, अर्जुन समशेर, राजेंद्र परदेशी, श्रावण खर्डे, प्रथमेश तालखे यांच्यासह अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते व देशभक्त नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.




हिंदू एकता आंदोलन पक्षाने केंद्र सरकारकडे मागणी केली की, या हल्ल्याचा सर्जिकल प्रतिशोध घ्यावा आणि पाकिस्तानला योग्य ती जागा दाखवावी. तसेच, अशा घटनांवर कायमचा बंदोबस्त करावा, अशी संतप्त प्रतिक्रिया आंदोलनकर्त्यांकडून व्यक्त झाली.

## दिंडोरीलगत वस्तीवर बिबट्याच्या हल्ल्यात युवती ठार

**दिंडोरी ।** नाशिक रस्त्यावरील वनारवाडी पाटाजवळ बिबट्याच्या हल्ल्यात २१ वर्षीय युवती ठार झाली असून, वनारवाडी शिवारातील दुसरी घटना घडल्याने त्यामुळे दिंडोरी तालुक्यात हळहळ व्यक्त होत आहे.



दिंडोरी-नाशिक रस्त्यावरील वनारवाडी पाटाजवळ राजू चव्हाण यांचं शेत आहे. गावातील अखंड हरिनाम सप्ताह संपल्यानंतर चव्हाण कुटुंबीय त्यांच्या शेतात गवत कापण्याचे काम करत होते. त्यावेळी पायल राजू चव्हाण ही मुलगी ऊसालगत गवत कापत असताना अचानक बिबट्याने मागील बाजूने येऊन हल्ला केला. बिबट्याने तिच्या मानेला धरले तिने आरडाओरड केला. तिच्या शेजारी असलेल्याब बहिणीने बिबट्याने धरल्याचे पाहताच आरडाओरड केला. त्यावेळी पायलकडे धावले त्यानंतर बिबट्याने पायलला ६-७ फूट ओढत नेले. आजूबाजूचे शेतकरी पायलचे वडील चुलते व नातेवाईक ऊसाकडे धावले. गोंगाट झाल्याने पायलला तिथेचबाब बिबट्याने सोडून पळ काढला. पायलला नातेवाईकांनी खासगी रुग्णालयात आणले. तेथील डॉक्टरनी नकार दिल्याने दिंडोरी ग्रामीण रुग्णालयमध्ये दाखल करण्यात आले. तेथील वैद्यकीय अधिकारी डॉ. कदम यांनी तपासणी केली असता मृत घोषित केले.

## संसदीय लोकशाहीचे जनक : महात्मा बसवेश्वर

**बा**राव्या शतकात सामाजिक परिवर्तनाचे वारे वाहू लागले. समाजातील विषमता, अज्ञान, अंधश्रध्दा, जातीभेद, अस्पृश्यता, अनिष्ट रूढी परंपरा, चालीरीती, स्त्री पुरुष असमानता आदींमुळे समाज रसातळाला जात होता. यज्ञ, कर्मकांड यामुळे समाज पोखरला जात होता. या काळात महात्मा बसवेश्वरांसारखे क्रांतिकारक समाजसुधारक जन्माला आले व प्रबोधनाची नवी पहाट झाली. मध्ययुगाच्या बाराव्या तेराव्या शतकात धर्म सुधारण्याच्या माध्यमातून विद्रोहाची संकल्पना प्रत्यक्ष कृतीत उतरविणारा कृतिशील समाज सुधारक म्हणून महात्मा बसवेश्वर यांचे कार्य प्रेरणादायी ठरते. वस्तूतः विद्रोही संकल्पना त्या काळात अस्तित्वात नव्हती. ही आधुनिक काळातील संकल्पना आहे. तत्कालीन जीवनधारणेनुसार ज्याला बंडखोर म्हणता येईल अशी विचारधारा प्रस्तुत करणारा आणि प्रत्यक्ष कृतीतून ती सार्थ ठरविणारा एक खंदा कार्यकर्ता म्हणून महात्मा बसवेश्वरांची प्रतिमा लक्षात घ्यायला हवी. समता, मानवता, बंधुता, सामाजिक न्याय, लोकशाही विचार, स्वातंत्र्य, श्रमप्रतिष्ठा यांचे मूल्य समाजात रुजविण्यासाठी महात्मा बसवेश्वर यांनी बाराव्या शतकात सामाजिक परिवर्तन केले. "काय कवे कैलास!"श्रमशक्ती हीच खरी पूजा (Work is workship ) याची शिकवण दिली. भिक्षा मागून उदरनिर्वाह करणे महात्मा बसवेश्वरांना मान्य नव्हते. कायक, दासोह यांना ते प्राधान्य देत रसातळाला जाणाऱ्या समाजाला परिवर्तनाची गरज आहे हे ओळखून त्यांनी मानवता हाच खरा धर्म आहे. दया हे सर्व धर्माचे मूळ आहे अशी शिकवण देऊन अनुयायांना लिंगायत धर्माची दीक्षा दिली. यासाठी; जातीपातीचे कोणतेही बंधन नव्हते. कपाळाला भस्म, देहावर इष्टलिंग धारण करून सहज प्रवेश मिळत असे. त्यासाठी कोणत्या मंदिरात जाण्याची, कोणाला गुरू करण्याची गरज नव्हती. कोणत्याही धार्मिक विधीची कडक बंधने नव्हती.अग्रज ते अंतजा पर्यंत सर्वजण बसवाणाच्या च्या शरण चळवळीत सामील झाले. त्यात दलित , शूद्र, अस्पृश्य, अठरा पगड जाती धर्माचे अनुयायी होते. त्यांना सहजतेने भक्ती करण्याची संधी प्राप्त झाली.त्यात कोणते जप, तप, साधना , व्रत, वैकल्ये नव्हती.पुरुषांना व स्त्रियांना अनुक्रमे शरण व शरणी या नावाने ओळखले जाई. या चळवळीचे रूपांतर लिंगायत धर्मात झाले. शरणांची पूर्वसश्रमीची जात नष्ट झाली. अग्रज व अंत्यज यांच्यात रोटी बेटी व्यवहार सुरू झाले. जातीच्या भिंती तुटून पडल्या बसवाच्या शरण चळवळरुपी वृक्षाला समता, मानवता, बंधुता न्याय, विवेक, दासोह, कायक यांची गोड फळे आली. शरण चळवळीत राहणारा वचनावर विश्वास ठेवणारा, नित्य सत्य , शुद्ध आचरण करणारा, दासोह करणारा, लिंग जातीभेद न मानणारा मुक्त व्यक्ती म्हणजे शरण होय. बसवाच्या उपदेशाने व तत्वज्ञानाने सर्व प्रभावित झाले. शोषित , दलित, अज्ञानी लोकांना महात्मा बसवेश्वर देवदूत वाटू लागला. दारू विकणारा हेडद माराय्या वाटसरुंसाठी जलदुत बनला.त्याने तहानलेल्या माणसांसाठी पाणपोई सुरू केली. दारू विक्रीचा धंदा सोडून तो दूध ताक याची विक्री करू लागला. अनेक वेश्यांची मने परिवर्तित होऊन त्या सन्मार्गाला लागल्या. संसदीय लोकशाहीची सुरुवात अनुभव मंटपापासून झाली. समाजामध्ये अज्ञान दारिद्र्य असल्यामुळे विवेकी, सदाचारी वृत्तीचा अभाव होता. स्त्री पुरुष समानता नव्हती.स्त्रीला कमी लेखून तिला सन्मानाची वागणूक न देता दुय्यम स्थान दिले जाई. तिचे समाजातील अस्तित्व नगण्य होते. त्यासाठी स्त्री पुरुष भेदभाव न करता त्यांना समानतेची वागणूक मिळावी यासाठी महात्मा बसवेश्वर आणि अल्लम प्रभू यांच्या अध्यक्षतेखाली अनुभव मंडपाची स्थापना केली. स्त्री पुरुष तसेच सर्वजाती धर्माच्या लोकांना मुक्तपणे कोणत्याही विषयावर चर्चा विचार मंथन करता यावे, यासाठी अनुभव मंटपाची स्थापना करण्यात आली. सामाजिक प्रवाहात आणण्यासाठी त्यांना ज्ञानार्जनाची संधी मिळावी यासाठी महात्मा बसवेश्वर आग्रही होते. या अनुभव मंटपात एकूण ७७० शरण शरणी होत्या. त्यामध्ये ७०० पुरुष व ७० स्त्रिया यांचा समावेश होता. या ठिकाणी विविध क्षेत्रातील तत्त्वज्ञानी, धार्मिक पंडित, विद्वान, बुद्धीवादी अधिकारी वर्णी लावत असे. याच ठिकाणी हरळय्या चांभाराचा मुलगा शीलवंत तसेच मधुवारस ब्राह्मणाची मुलगी कलावती यांचा आंतरजातीय विवाह सर्वांच्या साक्षीने व संमतीने पार पडला. ते दोघे शरणशरणी इष्टलिंग धारक असल्यामुळे जातीपातीचा प्रश्नच नव्हता. तरी सनातनी राज व्यवस्थेला हा विवाह मान्य नव्हता. विरोधकांनी बिज्जल राजाला बसवाच्या या राज विरोधी कृत्याबद्दल राजाचे कान भरले.बसवेश्वराने राजद्रोह केला त्याची शिक्षा म्हणून हरळय्या तसेच मधूवारस यांना हत्तीच्या पायदळी देऊन मृत्यू दंडाची शिक्षा दिली. या घटनेने बसव अनुयायांमध्ये राजसत्तेविरोधात प्रचंड असंतोष व द्वेष निर्माण झाला. बिज्जल राजाच्या सैन्यांनी बसव अनुयायांना लक्ष्य करून त्यांना संपविण्याचे सत्र सुरू केले. त्यांच्यात तुंबळ युद्ध झाले. सैनिकांनी बसवाच्या वचन भांडारांना आगे लावली.तरी पण बसवाच्या शूरवीरांनी जीवावर उदार होऊन बरेच वचन साहित्य व ग्रंथ वाचविण्यात त्यांना यश आले. बसवेश्वर यांच्या या सामाजिक कार्यात त्यांच्या पत्नी गंगाबिका निलांबिका तसेच भगिनी नागाम्बिका यांचा मोलाचा सहभाग होता महिलांच्या उद्धारासाठी त्यांनी आपले जीवन समर्पित केले त्यांची वचने म्हणजे माणुसकीचा सागर होता. समता नायक म्हणून बाराव्या शतकातील या महामानवाला जयंती निमित्त विनम्र अभिवादन!



**- डॉ. श्यामसुंदर झळके,**
**सिन्नर ७४९८६७७८५३**

## महत्त्वाचे

### महात्मा फुले चित्रपटाच्या 'विशेष शो' चे आयोजन



**नाशिक ।** क्रांतीसुर्य महात्मा जोतीराव फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर आधारित फुले चित्रपट नुकताच प्रदर्शित झाला आहे. महात्मा फुले जयंती उत्सव समितीच्यावतीने या चित्रपटाच्या विशेष शोचे आयोजन करण्यात आले आहे. याप्रसंगी राज्याचे माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे अशी माहिती महात्मा फुले जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष अंबादास खैरे यांनी दिली. महात्मा फुले जयंती उत्सव समितीच्या वतीने सोमवार, दि. २८ एप्रिल २०२५ रोजी सिटी सेंटर मॉल उंटवाडी नाशिक येथे दुपारी २ वाजता फुले चित्रपटाच्या विशेष शोचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवरांना निमंत्रित करण्यात आले आहे, अशी माहिती अध्यक्ष अंबादास खैरे यांनी दिली आहे.

### युवक राष्ट्रवादीच्या शहर उपाध्यक्षपदी करण टिळे

**नाशिक ।** राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या नाशिक शहर उपाध्यक्षपदी करण कुंदन टिळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे नाशिक शहराध्यक्ष अंबादास खैरे यांनी करण टिळे यांना नियुक्ती पत्र दिले आहे. करण टिळे यांनी



नाशिक शहरातील विविध क्षेत्रातील युवकांच्या समस्या सोडविण्यासाठी सक्रीय काम केले आहे. तसेच सामाजिक कार्यात देखील त्यांचा नेहमी सक्रिय सहभाग आहे. युवकांचे प्रश्न व समस्या सोडविण्यासाठी केलेले कार्य बघता करण टिळे यांची युवक नाशिक शहर उपाध्यक्ष पदी नियुक्ती करण्यात आली आहे. करण टिळे पक्ष संघटना मजबूती करिता योगदान देतील, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. यावेळी युवक शहराध्यक्ष अंबादास खैरे व शहर-जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांनी टिळे यांचे अभिनंदन केले.

### अभय योजनेत ग्राहकांकडून १५ कोटींचा भरणा

**नाशिक ।** महावितरणने वीज जोडणी कायमस्वरूपी तोडलेल्या थकबाकीदार ग्राहकांसाठी जाहीर केलेल्या अभय योजनेअंतर्गत वर्षभरात नाशिक परिमंडळात १२ हजार २१९ ग्राहकांनी १५ कोटी रुपयांचा भरणा करून थकबाकीतून कायमची मुक्ती मिळवणे आहे. ८२० ग्राहकांना त्यांच्या मागणीनुसार पुन्हा वीजजोडणी देण्यात येऊन त्यांच्या घरामध्ये पुन्हा प्रकाश देण्यात आला आहे. 31 मार्च पर्यंत थकित रक्कम दिल्यामुळे कायमस्वरूपी वीजपुरवठा खंडित झालेल्या घरगुती आणि व्यावसायिक व औद्योगिक ग्राहकांसाठी ही योजना हाती घेण्यात आली होती. योजनेत ग्राहकांना दिलासा देण्यासाठी थकित बिलाच्या मूळ रकमेवरील व्याज आणि विलंब आकाराच्या स्वरूपातील दंड माफ करण्यात येणार होता त्यामुळे या योजनेला ग्राहकांचा चांगला प्रतिसाद मिळाला. मूळ बिलाच्या ३०% रक्कम भरून उरली ७० टक्के रक्कम भरायची सवलत ग्राहकांना मिळाली आहे.

### टेबल टेनिस स्पर्धेत क्षितिजा भावसारला कांस्यपदक



**नाशिक ।** येथील नाशिक जिमखाना तथा यशवंत व्यायामशाळेच्यावतीने जागतिक टेबल टेनिस दिनानिमित्त खुल्या पुरुष व महिलांच्या टेबल टेनिस स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धेत महिला गटात दिव्यांग टेबल टेनिसपटू क्षितिजा भावसार हिने कांस्यपदक पटकावले. क्षितिज केटीएचएम महाविद्यालयाची विद्यार्थिनी आहे. तिला पदक, सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. जिमखाना चेअरमन दीपक पाटील, क्रीडा संघटक आनंद खरे, क्रीडा संघटक नितीन हिंगमिरे, स्पर्धा आयोजक तथा टेबल टेनिस प्रशिक्षक शशांक वाजे यांच्या हस्ते पारितोषिक देण्यात आले.

### विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानावर आधारित शिक्षण द्या : मित्तल

**नाशिक ।** जिल्हा परिषद शाळेतील शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी शिक्षकांनी अधिक प्रयत्न करणे आवश्यक आहे. शिक्षणात तंत्रज्ञानाचा अधिकाधिक वापर करावयाचा आहे. त्या संदर्भात भर देण्याच्या सूचना जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांनी केल्या. मंगरूळ, तालुका चांदवड येथील जिल्हा परिषद शाळेला शुक्रवारी (दि.२५) मित्तल यांनी भेट दिली. आदर्श शाळा उपक्रमाची यावेळी त्यांनी पाहणी केली. शाळेतील भौतिक सुविधा, शैक्षणिक उपक्रम आणि विद्यार्थ्यांसाठी राबवण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती त्यांनी घेतली. शाळेतील मुख्याध्यापक व शिक्षकांशी त्यांनी यावेळी संवाद साधला. आदर्श शाळा उपक्रमांतर्गत शाळेत काय बदल घडले याची माहितीही त्यांनी यावेळी जाणून घेतली. शाळेतील विद्यार्थ्यांशी संवाद साधला. यावेळी मच्छिंद्र साबळे यांच्यासह तालुकास्तरीय अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.




# वादग्रस्त पुणेगाव डावा कालव्याच्या कामाची माहिती दडविण्याचा प्रयत्न

## पितळ उघड होण्याची भ्रष्ट अभियंत्यांना भीती?

**नाशिक ।** वादग्रस्त पुणेगाव डाव्या कालव्याच्या कामात झालेल्या भ्रष्टाचाराचे पितळ उघडकीस येऊ नये म्हणून नांदूर मधमेश्वर प्रकल्प विभागा कडून कामाच्या संदर्भातील माहिती दडविण्याचा केविलवाना प्रयत्न कार्यकारी अभियंता मनोजकुमार डोकचोळे आणि उपाभियंता योगिता घुगे यांच्याकडून होत असल्याचे दिसून येत आहे. माहिती मिळण्यासाठी दिलेल्या अर्जाची मुदत संपून अनेक दिवस उलटूनही माहिती मिळत नसल्याने संबंधित प्रकरणातील भ्रष्टाचाराला दुजोरा मिळत आहे. कामात पारदर्शकता असल्याच्या बाता ठोकणारे कार्यकारी अभियंता डोकचोळे नेमके कशाला घाबरता असा सवाल उपस्थित केला जात आहे.

पुणेगाव डाव्या कालव्याच्या कामात मोठा भ्रष्टाचार झाल्याचे दै 'महासागर' ने उघडकीस आणल्यानंतर संपूर्ण सिंचन विभागात खळबळ उडाली आहे. मार्च महिन्याच्या शेवटच्या टप्प्यात अभियंत्यांनी तब्बल १२ कोटी रुपयांचे बिल मंजुरीसाठी महामंडळाला सादर केले. मात्र काम न करताच बिल लाटण्याच्या प्रयत्नात असलेल्या भ्रष्ट अभियंत्यांचा बुरखा फाटला मात्र मार्च अखेर सदरचे वादग्रस्त असलेले आठ कोटी रुपयांचे बिल मंजूर करून घेण्यास अधिकाऱ्यांना यश आले. याप्रकरणी तक्रार देखील करण्यात आली मात्र लेखा शाखेतील आणि महामंडळातील भ्रष्ट अधिकाऱ्यांना हाताशी धरून संबंधित अभियंत्यांनी शासनाच्या तिजोरीवर दरोडा टाकलाच! पुणेगाव कालव्याला फार कमी वेळा पाणी सोडले जाते त्यामुळे या कामाची कुठलीही गरज नव्हती असे असताना ६३ कि.मी.चे मातीकाम आणि अस्तरीकरणाचे नूतनीकरणाच्या कामाचा पुणेगाव कालवा उपविभागाकडून घाट घालण्यात आला. जवळपास १०० कोटी रुपयांच्या या कामासंदर्भात शेतकऱ्यांचा तीव्र विरोध असताना सुरुवातीपासूनच ठेकेदार आणि अधिकाऱ्यांनी शासनाच्या डोळ्यात धुळफेक करीत बोगस बिले लाटण्यास सुरुवात केली. मार्च ३१ मध्ये या कामाच्या संदर्भात मोठे बिल मंजूर करून घेण्याच्या प्रयत्नात असलेल्या अधिकाऱ्यांचे बिंग फुटले.



पुणेगाव डावा कालवा

पंचनामा

सुधीर उमराळकर

दरम्यान इतक्या मोठ्या कामात पारदर्शकता असणे गरजेचे असताना या कामासंदर्भात माहिती उघडकीस येऊ नये यासाठी अधिकाऱ्यांनी कमालीची गोपनीयता पाळली आहे. पुणेगाव उपविभाग कार्यालयातील कर्मचाऱ्यांना देखील आपल्या कार्यालय मार्फत इतके मोठे काम सुरू असल्याचे माहित नसल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. हा संपूर्ण प्रकार संशयास्पद असताना कार्यकारी अभियंता मनोजकुमार डोकचोळे हे देखील माहिती देत नसल्याने या कामात भ्रष्टाचार झाल्याचे जवळपास सिद्ध होत आहे. कालव्याचे काम खरोखरच नियमानुसार झाले आहे तर अधिकारी कशाला आणि कुणाला घाबरत आहे असा सवाल उपस्थित केला जात आहे. स्वच्छ कारभाराची पुंगी वाजवणाऱ्या डोकचोळें कडून माहिती उपलब्ध होत नसल्याने त्यांच्या कार्यप्रणाली बाबत आता संशय व्यक्त केला जात आहे. आपल्या नाकाखाली टिच्चून काही कर्मचारी राजरोसपणे भ्रष्टाचार करीत करीत असल्याचे निदर्शनास आणून देखील डोकचोळेंकडून त्या भ्रष्ट कर्मचाऱ्याला पाठीशी घातले जात आहे. त्यामुळे डोकचोळेचा कारभाराचे किती (अ) पारदर्शक आहे स्पष्ट झाले आहे. कार्यकारी अभियंत्यांच्या एककल्ली कारभारा मुळे कार्यालयातील इतर कर्मचाऱ्यांना मनस्ताप सोसावा लागत आहे. त्यामुळे त्यांची या विभागातून बदली करण्यात यावी अशी मागणी कर्मचाऱ्यांकडून दबक्या आवाजात केली जात आहे.

**सिंचन विभागाशी संबंधित कुठलीही तक्रार असल्यास मो. ८६०५३८४९२५ या नंबरवर संपर्क साधावा.**

# बदल्यांच्या आडून मोठी माया जमवल्याची चर्चा

## अधीक्षक शेळके यांची बदली करण्याची मागणी





**नाशिक ।** सिंचन विभागातील बदल्यांमुळे पुन्हा चर्चेत आलेले वादग्रस्त अधीक्षक भाऊलाल शेळके हे चौकशीच्या नावाखाली एकच कार्यालयात तब्बल आठ ते दहा वर्षांपासून कार्यरत असून बदल्यांच्या आडून त्यांनी मोठ्या प्रमाणावर माया जमवल्याची सिंचन विभागात दबक्या आवाजात चर्चा आहे. तर आपली चौकशी लावण्यात आल्याचे शेळके यांनी मान्य केले असल्यामुळे तक्रारदाराच्या तक्रारीत तथ्य असल्याचे प्रथमदर्शनी आढळून आले आहे.

सन २०१२-१३ मध्ये झालेल्या सरळ सेवा भरतीमुळे वादाच्या केंद्रस्थानी आलेले भाऊलाल शेळके हे अलीकडे सिंचन विभागातील कर्मचाऱ्यांच्या बदल्यांमुळे पुन्हा एकदा चर्चेत आले आहे. शेळके यांच्यावर वरिष्ठ अधिकारी चांगलेच मेहरबान असल्याचे चित्र असून गेल्या आठ ते दहा वर्षांपासून एकाच ठिकाणी कार्यरत असल्याने आता तरी त्यांची बदली करा अशी मागणी केली जात आहे. तत्कालीन अधिकाऱ्यांनी शेळके यांची चौकशी लावली होती या चौकशीच्या आडून शेळके गेले आठ ते दहा वर्षापासून एकच ठिकाणी काम करत असून त्याचा लाभ घेत त्यांनी बदलांच्या अडून माया जमवल्याचे बोलले जाते.

शेळके गेल्या तीन ते चार वर्षांपासून विशेष अधीक्षक पदाच्या पदोन्नती साठी पात्र आहेत. परंतु चौकशीच्या नावाखाली पदोन्नती होत नसल्याचा फायदा ते घेत असल्याची त्यांच्याच कार्यालयात चर्चा आहे.शेळके यांची चौकशी दोन वर्षांपूर्वी संपल्याचे काही जाणकारांचे म्हणणे आहे. मात्र असे असताना त्यांची पदोन्नती का होत नाही असा सवाल उपस्थित केला जात आहे. पदोन्नतीच्या माहिती मध्ये देखील शेळके यांनी चौकशी प्रस्तावित असल्याची चुकीची माहिती शासनाला सादर केल्याचे समजते. त्यामुळे या प्रकरणाची देखील चौकशी करण्याची मागणी केली जात आहे.इतर कर्मचाऱ्यांच्या बदलीसाठी शासन निर्णय असून शेळके यांच्या पदोन्नतीसाठी विशेष शासन निर्णय होणार आहे का? असा सवाल उपस्थित केला जात आहे.

# जिल्हा बँकेने सक्तीची कर्जवसुली बंद करण्याची मागणी

## शेतकरी समन्वय समिती व ९३८ आदिवासी सहकारी संस्था तसेच जिल्ह्यातील शेतकरी संघटनांच्या बैठकीत निर्णय



**नाशिक ।** नाशिक जिल्हा मध्यवर्ती बँकेने सक्तीची कर्ज वसुली बंद करावी तसेच शेतकऱ्यांचे संपूर्ण कर्ज माफ करावे व नाशिक जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या फक्त मुद्दल घ्यावे संपूर्ण व्याज शासनाने भरावे या मागणीवर शेतकरी समन्वय समिती व 938 आदिवासी सहकारी संस्था तसेच जिल्ह्यातील शेतकरी संघटना आज नाशिक येथे झालेल्या हुतात्मा स्मारक ग्राउंडवर झालेले बैठकीत याबाबत निर्णय घेण्यात आला.

या बैठकीस भगवान बोराडे शेतकरी समन्वय समिती, कैलास बोरसे ९३८ आदिवासी सहकारी संस्था राज्य अध्यक्ष, दिलीप पाटील, दगाजी आहेर, ,रमेश बोरस्ते, बाळासाहेब बोरस्ते, मारुती घारे, पी डब्ल्यू अहीरे, शांताराम माळोदे, सुवर्ण सोळुंके, भाऊसाहेब गारे, नाथा उदार, कुंडलिक जाधव, सोमनाथ साळवे यांच्यासह शेतकरी उपस्थित होते.

बैठकीत राज्य सहकारी बँकेचे प्रशासक विद्याधर अनासकर यांनी ११ एप्रिल रोजी जिल्हा मध्यवर्ती बँकेमध्ये शेतकऱ्यांच्या बैठकीत शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी द्यावी व शेतकऱ्यांचे संपूर्ण व्याज माफ करावे व मुद्दलाचे १० ते करून द्यावे याविषयी व कर्ज वसुलीस कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी दिलेल्या स्थगिती तसेच मुंबई येथे झालेल्या माणिकराव कोकाटे यांचे निर्णयावर शेतकरी ठाम आहेत; मात्र अजित पवार यांनी २३ एप्रिल रोजी झालेल्या बैठकीत एक लाखापर्यंत दोन टक्के व्याज दोन ते तीन लाखापर्यंत तीन टक्के व्याज पाच ते दहा लाखापर्यंत चार टक्के व्याज व दहा लाखाच्या पुढे पाच टक्के व्याज असे आकारले जाईल, असे सांगितले. त्यास या बैठकीमध्ये सर्व शेतकऱ्यांनी विरोध केला. शेतकऱ्यांचे संपूर्ण व्याज माफ करावे, शेतकऱ्यांच्या मुद्दलाचे दहा हप्ते करून द्यावे व अल्पभूधारक शेतकऱ्यांचे संपूर्ण कर्ज माफ करावे, असे ठरविण्यात आले. याबाबत लवकरच मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, अर्थमंत्री, सहकारमंत्री, आदिवासी विकासमंत्री यांची भेट घेण्याचे ठरले.

# लोकसेवा हक्क कायद्याच्या अंमलबजावणीस दहा वर्षे पूर्ण

## सेवा हक्क दिन म्हणून '२८ एप्रिल' साजरा होणार : राज्य शासनाचा निर्णय

**नाशिक ।** 'आपली सेवा आमचे कर्तव्य' असे सांगणाऱ्या लोकसेवा हक्क कायद्याच्या अंमलबजावणीस दि.२८ रोजी दहा वर्षे पूर्ण होत आहेत. यानिमित्त २८ एप्रिल हा दिवस सेवा हक्क दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. या दिवशी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे.

या कायद्यांतर्गत नाशिक विभागातील पाचही जिल्ह्यात १ एप्रिल २०२४ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत विविध लोकसेवांसाठी एकूण ५५ लाख ४८ हजार ४८५अर्ज प्राप्त झाले होते. त्यातील ५१ लाख ३७ हजार ४७४ अर्ज निकाली काढण्यात आले. त्यापैकी ५० लाख ६८ हजार १३३ अर्ज निश्चित केलेल्या कालमर्यादेत निकाली काढण्यात आले. सेवांसाठी प्राप्त होणाऱ्या अर्जांची संख्या बघता नाशिक विभाग दुसऱ्या क्रमांकावर आहे, अशी माहिती लोकसेवा हक्क आयोगाच्या नाशिक विभागाच्या आयुक्त चित्रा कुलकर्णी यांनी दिली आहे.

नागरिकांना दैनंदिन जीवनात विविध दाखल्यांची आवश्यकता असते. कधी पाल्याच्या शालेय, महाविद्यालयीन प्रवेशासाठी उत्पन्न, अधिवास, नॉन क्रिमिलेअर, राष्ट्रीयत्व, शेतकरी, विवाह नोंदणी, दिव्यांग दाखला, जन्म-मृत्यू नोंद दाखल्यासह विविध दाखल्यांची आवश्यकता असते. त्यासाठी नागरिकांना विविध शासकीय कार्यालयांमध्ये जावे लागत असे. त्यात बराच कालावधी जात असे. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसयांनी नागरिकांना आवश्यक सेवा ऑनलाइन आणि विहित केलेल्या कालावधीत उपलब्ध व्हाव्यात म्हणून सन २०१५ मध्ये महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम लागू केला. याअधिनियमाची अंमलबजावणी २८ एप्रिल २०१५ पासून सुरू झाली. या कायद्यांतर्गत 'आपले सरकार' पोर्टलवर आता पर्यंत ३८ विभागांच्या ९६९ सेवा ऑनलाइन उपलब्ध झाल्या आहेत. महाराष्ट्र लोकसेवा हक्क कायदा हा एक क्रांतिकारी कायदा असून,



त्यामध्ये अन्य राज्यांच्या तुलनेत विविध वैशिष्ट्ये आहेत. लोकसेवा देताना पारदर्शकता, उत्तरदायीत्व, कालबद्धता, कार्यक्षमता या बाबी साध्य करण्याचा प्रयत्न या कायद्यातून झाला आहे.

डिजिटल तंत्रज्ञानाचा उपयोग करून लोकसेवा वितरणामध्ये सक्षमता व पारदर्शकतेच्या संस्कृतीस चालना देण्यावर या कायद्याचा भर राहिला आहे. नागरिकांना दिल्या जाणाऱ्या सार्वजनिक सेवांचा दर्जा उंचावणे व त्या विहीत कालावधीत जबाबदारीपूर्वक पुरविल्या जातील याची खात्री करणे या कायद्याचे प्राथमिक उद्दिष्ट आहे. राज्याचे माजी मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव हे विद्यमान मुख्य आयुक्त आहेत. महाराष्ट्र लोकसेवा हक्क कायद्याखाली अधिसूचित करण्यात आलेल्या ऑन लाइन सेवांची अद्ययावत माहिती राज्य शासनाच्या Aaplesarkar. mahaonline. gov. in आपले सरकार या संकेत स्थळावर उपलब्ध आहे. याशिवाय या संकेत स्थळावर महाराष्ट्र लोकसेवा हक्क आयोगाची माहिती, लोकसेवा हक्क कायदा, नियम व त्याची अंमल बजावणी, वार्षिक अहवाल आदी माहिती उपलब्ध आहे. या संकेतस्थळाचा वापर करताना नागरिकांनी प्रथम वापरकर्ता म्हणून स्वतःची नोंदणी करणे आवश्यक आहे.

पहेलगाम येथे अतिरेक्यांनी केलेल्या भ्याड हल्ल्यात निष्पाप २७ पर्यटकांचा बळी गेल्याने जग हादरले आहे. सदर घटना अत्यंत क्रूर व निंदनीय ठरली आहे. या घटनेत प्राण गमावलेल्या निष्पाप पर्यटकांना देशभर श्रद्धांजली अर्पण करण्यात येत आहे. गेल्या काही दिवसांपासून हिंदू मुस्लिमांमध्ये द्वेष पसरण्याचे काम राजकीय पातळीवर सुरू झाले होतेच. कारण उथळ राजकारणी तर मशिदीत घुसून मारण्याची, तर काहीजण मंदिर उडवून देण्याची भाषा करीत होते. या सर्वांना कडक सुरक्षा व्यवस्था आहे. परंतु ज्यांची माथी फिरते त्यांना कसली आली सुरक्षा? इतका द्वेष राजकारणात यापूर्वी तरी इतका पोहोचलेला नव्हता. हा द्वेष काही मोदी आल्यापासुन गेल्या दहा वर्षात निर्माण झाला नाहीये. अशा प्रकारची कत्तल जगभर चालु आहे. भारतच नाही तर फ्रांस, इंग्लंड देश पण अशा मुलतत्ववाद्यांच्या जिहादात होरपळले आहे. जे लोक हे इंटलीजेंन्सचे फेल्युअर आहे असं म्हणताय, ते एक गोष्ट विसरताय की, तिथलं राज्य सरकार, काही स्थानिक पब्लीक ही आतंकवाद्यांना सहानुभुती दाखवणारी आहे. जिथ कुंपनच शेत खाणार असेल, तर सरकार तरी काय करणार? पण याचा अर्थ सरकारला 'क्लीनचीट' देऊन चालणार नाही. काही गोष्टी विसरताच येणार नाही. कंधार हायजॅक, अक्षरधाम हल्ला, रघुनाथमंदिर हल्ला, कारगिल हल्ला, संसदेवर हल्ला, अमरनाथ यात्रेकरूंवर झालेला हल्ला, गोधरा कांड, पठाणकोट हल्ला, उडी हल्ला, पुलवामा हल्ला अशी सारी प्रकरणे भाजपची सत्ता असलेल्या राज्यांमध्येच घडलेली आहे. त्यामुळे 'हम ऐसा करेंगे, वैसा करेंगे' या मोदींच्या घोषणा कायम फेल ठरल्या आहे ही वस्तुस्थिती आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे वरील घटना झाल्या, त्यावेळी नेमके देशातील काही राज्यातील निवडणुका सुरू असतानाच का होतात? हा संशोधनाचा विषय आहे. सध्या तर दंगे झाले म्हणून बुलडोझर फिरवण्याची मानसिकता तयार झाली आहे. अमुक जातीच्या विरोधात बोलला म्हणून त्याला मारून टाकण्याची मानसिकता तयार झाली आहे. अमुक धर्म संपवून टाकण्याची भाषा करण्याची मानसिकता दिसत आहे. धर्मांतर करा नाहीतर मृत्यूला सामोरे जा अशीही परिस्थिती निर्माण झाली आहे. आमचे ऐकले नाही तर तुमचे राष्ट्र उद्ध्वस्त करू अशी मानसिकता दिसत आहे. आमचाच धर्म, आमचाच पक्ष श्रेष्ठ असे म्हणत तलवारी, बंदुका, हत्यारे फिरवत राहणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. त्यातच आमचीच संस्कृती सर्व जगात एकमेव आणि थोर असा डंका पिटणाऱ्यांची मानसिकता वाढीस लागली आहे. खास करून धर्म आणि राजकारण यांच्यात अशा मानसिकतेचे पुंड आणि गुंड सोकावलेले आहेत. सगळा समाज त्यांनी ताब्यात घेतला आहे. सामान्य लोकांना त्यांनी वेठीस धरले आहे. वेगवेगळे विषय काढून समाजात सगळीकडे विष कालवायला हे आघाडीवर असतात. अशा मानसिकतेचे हे लोक मनोविकृत समजले पाहीजे. वर वर आपणास या सर्वांमध्ये खोटारडेपणा, हिंसकपणा, दहशतवादी वृत्ती आणि सगळे कायदे पायदळी तुडविणे ही लक्षणे दिसतात.

# काश्मीरमधील 'त्या' २७ जणांसाठी 'भारत' रडतोय!





पहलगाममधल्या बैसरन इथं अतिरेकी पोहोचले. पर्यटकांना धर्म विचारु लागले, तेव्हा त्यांना एका स्थानिक घोडेस्वाराने विरोध केला. घोडेस्वारीसाठी तो पर्यटकांना तिथं घेऊन आला होता. यांचा धर्म कोणताही असेल; पण हे सर्वजण निष्पाप आहेत. काश्मीरचे पाहुणे आहेत. कोणावरही गोळी झाडू नका, अशी विनंती त्याने केली.

अतिरेक्यांनी त्याचं ऐकलं नाही. या घोडेस्वाराने एका अतिरेक्याच्या हातातली एके४७ रायफल हिसकावून घेतली. तोवर दुस?्याने त्याच्यावर हल्ला केला. धरपकड झाली आणि या घोडेस्वाराला गोळी लागली. रक्तबंबाळ झालेल्या या घोडेस्वाराला हॉस्पिटलमध्ये नेण्यात आलं. पण तोवर या घोडेस्वाराचा मृत्यू झाला होता. या घोडेस्वाराच्या विरोधामुळे अनेकांचे प्राण वाचले, असं पर्यटकांनी सांगितलं.

या घोडेस्वाराचे नाव सैय्यद हुसैन शाह. घरात कमावणारा एकुलता एक पोरगा अतिरेक्यांशी लढता लढता मृत्यूमुखी पडला. धर्माच्या नावावर कुणी कितीही वणवा पेटवला, तरी जसे धर्मांध विकृत अतिरेकी असतात, तसेच त्या धर्मांधतेच्या विरोधात उभी राहणारी सैय्यदसारखी लढाऊ बाण्याची माणसंही असतात. पाकिस्तानातून अतिरेकी आपल्या देशात घुसून हिंदू लोकांना गोळ्या घालून मारत आहे. मग हिंदू हिंदू म्हणून मिरवणारे बजरंग दल, आरएसएस, विश्व हिंदू परिषदेचे ठेकेदार पाकिस्तान मध्ये एके ५६ घेऊन कधी घुसणार आहे? त्यानी आपले २७ मारले, त्यांचे आठ दहा तरी मारणार आहे की नाही?

बरं पाकिस्तान मध्ये नका जाऊ किमान सीमेवर जाऊन डोळे वटारतील का? त्यांच्या बाजूने चीन असला म्हणून काय झाले, मोदींनी लाल डोळे करून चीनकडे बघितले तरी तो घाबरतो, असे मोदी भक्त म्हणतात.

मग नेमके मोदी हवेत तीर का मारतात याचे उत्तर मिळाले पाहीजे. पहेलगामच्या आतंकवादी हल्ल्याला पाच दिवस झालेत. बऱ्याच लोकांचे अंतिमसंस्कार बाकी आहेत. टीव्ही बघा पंतप्रधानांचा निवडणूक प्रचार सुरू झाला आहे. पर्यटक अजून घरीही पोहचले नाही. दुर्दैव म्हणावे लागेल देशाचं.

इतिहास असा आहे की, भारत स्वतंत्र झाला त्यावेळी १९४७ साली काश्मीरवर एक राजा राज्य करीत होता. त्याला भारतामध्ये विलीन होण्यास सांगितले होते. परंतु तो तयार नव्हता. परंतु अचानक एक दिवस पाकिस्तान आर्मीने काश्मीरवर हल्ला केला व ते श्रीनगरच्या जवळ पोहोचले होते. तेव्हा त्या राजाने भारत सरकारला विनंती केली की, आम्हाला वाचवा व आमचे राज्य तुम्ही घ्या. रात्रीतून भारतीय सैन्याने काश्मीर मधून पाकिस्तानी सैन्याला मागे ढकलले व काश्मीर भारतात विलीन झाले.

हा प्रश्न हिंदू मुस्लिम नसून पाकिस्तानला १९४७ पासून काश्मीर हवा आहे. कारण सिंधू नदी व तिच्या उपनद्या ह्या काश्मीर मधून जातात व पाकिस्तानचे सर्व शेतकरी सिंधू नदीवर अवलंबून आहे. हा फार मोठा पाणी प्रश्न आहे. परंतु राजकारणी लोक याला मुद्दाम धार्मिकतेचा मुलामा देत आहे. हा सर्व दोष राजकारण्यांचा आहे का? पाकिस्तान व भारत अतिरेक्यांना थांबू शकत नाही? हे लोक सर्व करू शकतात. परंतु मुद्दाम करत नाही. या प्रश्नावरच त्यांना मतदान होते व



थर्ड अम्पायर

जयंत महाजन
jayantmahajansir@gmail.com
मोबा. ९४२०६९१४२०

त्यांचे सरकार तयार होते. पाकिस्तानशी चर्चा करून त्यांना चांगली धमकी दिली पाहिजे, की जर हे अतिरेकी तुम्ही संपविले नाही. तर आम्ही तुमच्या घरात घुसून त्यांना मारू. तरच ते लोक ॲक्शन घेतील. कारण भारत पाकिस्तान युद्ध कोणत्याही देशाला परवडणार नाही.

युक्रेन आणि गाझा पट्टीत सर्व बरबाद झाले आहेत. युद्ध झाले तर तो देश अनेक वर्षे मागे निघून जातो. लोकशाहीमध्ये सरकारला जबाबदार धरणं हे प्रत्येक नागरिकाचं कर्तव्य असतं. जर माध्यमं सरकारला प्रश्न विचारण्याऐवजी धर्माच्या चष्म्यातून घटना समजावू लागली, तर ही लोकशाही साठी अत्यंत गंभीर बाब ठरते.

आज गरज आहे ती खऱ्या प्रश्नांची, खरी उत्तरं शोधण्याची. कारण दहशतवाद धर्म पाहून नव्हे, तर एका विशिष्ट हेतूसाठी निर्दोषांना लक्ष्य करतो आणि त्याला रोखण्याचं काम केवळ राष्ट्रभक्तीच्या नावाखाली भावना पेटवण्याने नाही, तर उत्तरदायित्व आणि सजग नागरिकतेनेच होणार आहे.

जेव्हा हिंदूंचे आराध्य राजे छत्रपती शिवरायांना अर्वाच्य शिवीगाळ करणाऱ्या आणि राजमाता जिजाऊ मासाहेबांचं चारित्र्यहनन करणाऱ्या कोरटकरला विशेष सुरक्षा पुरवली, तेव्हा तोंडातून ब्र सुद्धा न काढणाऱ्या बांडगुळांना आज सध्या हिंदू धर्माचा पुळका आलाय. छत्रपतींच्या पुतळ्यात भ्रष्टाचार झाल्यामुळे तो कोसळला. त्यावेळी पुतळा बनवणाऱ्या, बसवणाऱ्या, उद्घाटन करणाऱ्या, कुणाकुणाचाही निषेध न करणारे आज हिंदुत्व शिकवताहेत.

रोज आत्महत्या करणारा हिंदू शेतकरी राजा स्वतःच्या मागण्यांसाठी रस्त्यावर उतरतो तेव्हा त्याची हेटाळणी करणारे आज हिंदूत्व शिकवताहेत. ज्याअर्थी एवढा धिंगाणा घालताय त्याअर्थी 'दाल में कुछ काला है'. कीतीही मुस्लीमद्वेष पसरवाल, पण लोक आता हुशार झालेत. या देशावर प्रेम असलेले देशातले सगळे मुस्लिम जागेवरच आहे. कारण वरच्या सगळ्या प्रसंगांमध्ये जेव्हा अनेकजणांनी शेपूट घातले होते, तेव्हा हे मुस्लिम बांधव काश्मिरमध्ये हिंदुंच्या पाठीशी सक्रियपणे उभे होते.

### काश्मीर समस्येवर हा उपाय शक्य?

देशातील नागरिकांनी काश्मीरला जाऊ नये, अमरनाथ यात्रा करू नये असे संदेश समाज माध्यमांमध्ये फिरत आहे. जर आपण सर्वांनी तीन-चार वर्षे अमरनाथ यात्रा करणे थांबवले तर आपण मरणार का? ही तीर्थयात्रा काश्मिरींसाठी उपजीविकेचे साधन आहे. हेच काश्मिरी आपल्या सुरक्षा दलांवर जसे की बीएसएफ, एसआरपीएफ, सीआरपीएफ, आयपीएस, आयएएस जवानांवर हल्ला करतात, दगडफेक करतात आणि भारतीय सैन्याला विरोध करतात. ते काश्मीरमध्ये धार्मिक शाळा बांधू देत नाहीत. काश्मीरवर दोन वर्षांसाठी आर्थिक बहिष्कार घाला. आझादी असल्याचा दावा करणाऱ्या सर्व यासीन मलिक आणि गिलानींचे तंबू कोसळतील. मग बघा, पाकिस्तान आणि चीन किती काळ आणि किती काश्मिरींना निधी देत राहतील. काश्मीरला जाऊ नका, त्याऐवजी शिमलाला जा, दार्जिलिंगला जा, केरळला जा, कन्याकुमारीला जा, ऊटीला जा, ओडिशाला जा, उत्तराखंड, गुजरातला जा, तुम्हाला कुठेही जा, पण काश्मीरला जाणे म्हणजे दहशतवाद्यांचे हात बळकट करण्यासारखे आहे. कोणीही कोणत्याही काश्मीर एम्पोरियममधून काहीही खरेदी करू नये. राष्ट्राच्या भल्यासाठी, फक्त दोन वर्षे हे करून पहा, संपूर्ण चित्र बदलेल.

### मोदींना काही प्रश्न का विचारले जाऊ नयेत?

अग्निवीर सारख्या थर्डक्लास योजना का आणल्या, डिफेन्स बजेट का कमी केले, लाखाच्या वर जवानांची भरती का झाली नाही, सुरक्षा दलाचे खाजगीकरण का केले, पोलीस आणि आर्मी पर्यटन क्षेत्रात का उपलब्ध नव्हती, इंटेलीजेंस का फेल झाले, एवढे आतंकवादी बॉर्डर मधून इतके आत कसे घुसले, कसे आरामात पळून गेले, मोदी आणि डोभाळ काय करत होते? नोटबंदीने आतंकवादाची कंबर तोडलेली मग हे कसे घडले, कलम ३७० हटवून अदानीला तेथे भूखंड देवून देशाला काय फायदा झाला? आणि पुलवामा अटॅक होऊन सहा वर्ष होऊन गेली, तरी त्यावर काहीच कसे झालें नाही? ती केस थंड डब्यात टाकण्याचे काय कारण? २६/११ च्या मुंबईवरील दहशतवादी हल्ल्याने संपूर्ण देश हादरला होता.

त्यावेळी राज्याच्या गृहमंत्र्यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारत आपल्या पदाचा राजीनामा दिला होता. मग आताच्या केंद्र सरकारमधील गृहमंत्र्यांनी राजीनामा का दिला नाही? त्यांचा राजीनामा पक्षात व पक्षाबाहेरील नेते का मागत नाही? कारण यापूर्वी लोकशाही जिवंत होती, उत्तरदायित्व होतं आणि लोकांची भावना केंद्रस्थानी होती. पण आजच्या काळात चित्र पूर्णतः वेगळं आहे.

### मुस्लीमद्वेष पसरण्याचा फायदा नक्की कोण घेतं?

हिंदूंवर झालेल्या पहलगाम हल्ल्याचा निषेधच आहे. पण तो नक्की कुणी केलाय? हे समोर येईपर्यन्त कुणीच कुणावर विश्वास ठेवणार नाही. ते समोर आल्यावर त्यामागचे सूत्रधार कोण होते? त्यांना मिल्ट्री आणि बीएसएफची सुरक्षा भेदून आत यायला कुणी मदत केली? हे सगळे कळाल्याशिवाय उगाचंच उठसूट कुठल्याही धमार्ला दोष देवू नये. मागे एकदा एका बाईच्या नादी लागून कुरुलकर नांवाच्या देशद्रोह्यानं आपल्या सुरक्षाव्यवस्थेतली गुप्त माहिती पाकिस्तानला पुरवली, त्यावेळी त्याला पाठीशी घालणा?या वृत्तीसारखी प्रवृत्ती या हल्ल्याची मास्टरमाईंड असणारच.

त्या अतिरेक्यांना शस्त्रास्त्रं आणि पोलीस गणवेश पुरवून, सगळा प्लॅन रचून, "तुम्ही हिंदू आहात का मुसलमान? हे विचारून माणसे मारा म्हणजे भारत देशात मुस्लीमद्वेष पसरून दुही माजेल आणि आमचा फायदा होईल." अशी सुपारी देणारा दगाबाज कोण आहे, त्याला काय फायदा झालाय, हे सिद्ध झालेच पाहीजे. मुस्लीमद्वेष पसरण्याचा फायदा नक्की कोण घेतं? हे न्यायसंस्थेत तपासणी होऊन समोर आले पाहिजे. मग त्या दगाबाजाचा बदला कसा घ्यायचा ते संविधान, पोलीस दल आणि भारतीय लष्कर ठरवेल. पण पुलवामा हल्ल्याचा अजूनही शोध लागलेला नाही, हे सगळ्या भारतीयांच्या लक्षात आहे.

### काश्मिरींबाबत गैरसमज पसरवला जात आहे?

दहशतवाद्यांचा हल्ला अत्यंत पूर्वनियोजित होता. त्यांनी अतिशय निर्दयीपणे धार्मिक ओळख निश्चित करत केवळ हिंदूंची हत्या केलीय, जेणेकरून सामाजिक सलोखा आणखी बिघडावा, देशात अस्थिरता यावी असे त्यांचे होरे आहेत. हे दहशतवादी पाकपुरस्कृत जरी निघाले तरीही सीमापार जाऊन याचे उत्तर त्या सर्व दहशतवाद्यांना कंठस्नान घालूनच दिले जाईल हे नक्की.

सुरक्षा यंत्रणा कुठे गाफिल राहिल्या आणि गुप्तचर यंत्रणांना याचा सुगावा कसा लागला नाही याचीही खोलात जाऊन चौकशी होणं अनिवार्य आहे. धमार्चं राजकारण करून दहशतवादी कृत्य करताना धर्मांध माथेफिरूंकडून धर्म विचारला जातो. पण प्रेम, आपुलकी आणि सद्भाव असलेली माणुसकीची कृती करणाऱ्यांकडून धर्म विचारला जात नाही. ती कृती भेदाच्या पलीकडली, हृदयातून येणारी असते. काश्मीर मधील सर्व शहरांमधून नागरिक उत्स्फूर्तपणे ह्या हल्ल्याचा निषेध करत आहेत. तेथील वर्तमानपत्रांमधून निषेधाचा सूर ऐकू येत आहे. काश्मिरी माणसांनी त्या प्रसंगामध्ये प्राण पणाला लावून पर्यटकांना मदत केली. राजकीय स्वार्थामधून, धर्मांधतेचा विखार पसरवण्यातून जे कृत्य घडवले गेले ते निषेधार्ह आहे. पण त्यामागे हे सारे काश्मिरी लोक आहेत असा जो गैरसमज पसरवला जात आहे तो सर्वस्वी गैर आहे.

### एका जीवघेण्या संशयाला जागा आहे की नाही?

हिंदू मुस्लिम वाद निर्माण व्हावा ह्यासाठी खेळलेली "एक जीव घेणी" चाल असल्याची समाज माध्यमांमध्ये सुरू असलेली चर्चा पटो ना पटो पण त्यात काही अंशी सत्य दिसत आहे. कारण ह्या अगोदर इतके हल्ले झाले, पण कधी धर्म विचारला नाही. आले गोळ्या घातल्या आणि पळून गेले. आताच का धर्म विचारायची वेळ आली आतंकवाद्यावर? मोदींनी त्याच दिवशीचा जम्मू काश्मीर दौरा रद्द केला आणि विदेशात का गेले? नेमके त्याच दिवशी पहलगाम येथील बंदोबस्त का बाहेर पाठवला गेला? रोज तेथे पर्यटकांच्या सुरक्षितेकरिता बंदूकधारी बंदोबस्त असतो. मग त्याच दिवशी बंदोबस्त का नव्हता? भारतात सर्वात जास्त जवान तैनात केले जातात, तेथे २७ लोक मारली जातात आणि एकही आतंकवादी का सापडत नाही? मीडियाला देखील जे सांगेल त्या बातम्या वाजविल्या जातात की नाही?

जर ३७० कलम रद्द करून असे हल्ले होत असतील तर कशावरून देश सुरक्षित हातात आहे? सुरक्षा व्यवस्थेच्या गलथानपणा मुळे दहशतवादी हल्ला झाला असे आपणास वाटत नाही का? असा प्रश्न कठुआ येथील भाजप आमदार देवेंद्र मान्याल यांना एका राकेश शर्मा नावाच्या पत्रकाराने विचारल्यावर त्याच्यावर जीवघेणा हल्ला का झाला? पहलगाममध्ये जो हल्ला झाला ते सुरक्षा यंत्रणा आणि गुप्तचर यंत्रणेचं अपयश आहे हे काय लपून राहिले आहे का? दोनशे किलोमीटर अतिरेकी आत आले, दीड तास अंधाधुंद गोळीबार करीत राहिले आणि सहीसलामत निघून गेले. हे का घडले? कसे घडले?

# महाराष्ट्राच्या भल्यासाठी एकत्र या!

(कालच्या अंकावरून पुढे)

१९ जून १९६६ रोजी शिवसेनेची स्थापना झाल्यानंतर १९६७ साली कॉंग्रेसचे स. गो. बर्वे यांना बाळासाहेब ठाकरे यांनी पाठिंबा दिला होता. हे स. गो. बर्वे सनदी अधिकारी होते. त्यांना यशवंतराव चव्हाण यांनी कॉंग्रेस मध्ये आणून इशान्य मुंबई लोकसभा मतदारसंघात उमेदवारी दिली होती.

याच स.गो. बर्वे यांनी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची स्थापना केली होती. याच आधारावर गुजरातमध्ये जीआयडीसी स्थापन करण्यात आली. स. गो. बर्वे यांच्या निधनानंतर त्यांच्या भगिनी ताराबाई सप्रे यांनाही इशान्य मुंबई लोकसभा निवडणुकीत बाळासाहेब ठाकरे यांनी पाठिंबा दिला होता.

ज्या आदित्य ठाकरे यांच्या विरोधात वरळीतून एकनाथ शिंदे यांनी राज्यसभेवर निवडून आलेल्या माजी केंद्रीय मंत्री मिलिंद देवरा यांना उभे केले होते त्याच मिलिंद देवरा यांचे तीर्थरूप मुरली देवरा (तब्बल बावीस वर्षे मुंबई कॉंग्रेसचे अध्यक्ष राहिलेले) यांना महापौर बनविले ते बाळासाहेब ठाकरे यांनीच.

१३ ऑगस्ट १९६० रोजी आंतरराष्ट्रीय कीर्तीचे व्यंगचित्रकार बाळासाहेब ठाकरे यांच्या कुंचल्याने भल्या भल्यांना वठणीवर आणणाऱ्या मार्मिक या जागतिक कीर्तीच्या पहिल्या मराठी व्यंगचित्र साप्ताहिकाचे प्रकाशन मुख्यमंत्री आणि कॉंग्रेसचे ज्येष्ठ नेते यशवंतराव चव्हाण यांच्या शुभहस्ते झाले होते. पहिल्या महिला मराठी राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांना बाळासाहेब ठाकरे यांनी पाठिंबा दिला होता.

कॉंग्रेसचेच प्रणव मुखर्जी यांनाही राष्ट्रपती पदासाठी बाळासाहेब ठाकरे यांनी पाठिंबा दिला होता. या दोन्ही वेळा शिवसेना ही भारतीय जनता पक्ष प्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडीत होती. डॉ . ए. पी. जे. अब्दुल कलाम हे राष्ट्रपती आणि अटलबिहारी वाजपेयी हे पंतप्रधान असतांना डॉ. मनोहर गजानन जोशी हे लोकसभेचे अध्यक्ष होते आणि याच काळात संसदेच्या मध्यवर्ती सभागृहात स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांचे चित्रकर्ती सौ. चंद्रकला कुमार कदम यांनी तयार केलेले भव्य तैलचित्र लावण्यात आले.

या अभूतपूर्व ऐतिहासिक कार्यक्रमाच्यावेळी 'राम' म्हणून ओळखण्यात येणाऱ्या अटलबिहारी वाजपेयी यांचे 'लक्ष्मण' प्रमोद महाजन हे कां उपस्थित नव्हते आणि स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे सुपूत्र विश्वासराव सावरकर आणि त्यांच्या सहधर्मचारिणीना कशा परिस्थिती मध्ये दिल्लीत नेण्यात आले याचा साद्यंत वृत्तांत ज्येष्ठ पत्रकार कुमार कदम आणि शिवसेना नेते सुभाष देसाई यांच्याकडून जाणून घ्यावा.

२०१४ च्या लोकसभा निवडणुकीत भारतीय जनता पक्षाचे सहकारी असलेल्या शिवसेनेशी युती २४ सप्टेंबर २०१४ रोजी एकनाथ खडसे यांनी कुणाच्या सांगण्यावरून तोडली हेही जाणून घ्या आणि २०१४ च्या विधानसभा निवडणुकीत कॉंग्रेस, राष्ट्रवादी कॉंग्रेस, भारतीय जनता पार्टी, शिवसेना आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना स्वतंत्र लढले. पण शरद पवार यांच्या अदृष्य हातांनी देवेंद्र फडणवीस यांचे अल्पमतातील सरकार वाचल्यानंतर २२ वर्षात जेवढी बदनामी सहन करावी लागली नाही तेवढी बदनामी १२ नोव्हेंबर २०१४ ते ५ डिसेंबर २०१४ या २२ दिवसांत सहन करावी लागली, असे सांगून धर्मेंद्र प्रधान आणि चंद्रकांत पाटील यांना मातोश्रीच्या दरवाजावर पाठविण्याचे काम करीत आणि उद्धव ठाकरे यांचा पाठिंबा मिळवून २०१९ पर्यंत पाच वर्षे निर्धोक सत्ता देवेंद्र फडणवीस यांनी राबविली.

उत्तरार्ध

५ डिसेंबर २०१४ रोजी सकाळी विरोधीपक्षनेते असलेले एकनाथ संभाजी शिंदे उद्धव ठाकरे यांनी पाठिंबा दिल्याने सायंकाळी मंत्री झाले. २०१९ ला राजकीय समीकरणे बदलली. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी केवळ उद्धव ठाकरे यांना विरोध करण्यासाठी आपल्या इंजिनाची दिशा फिरती ठेवली? मग कधी भारताच्या राजकीय क्षीतिजावरुन मोदी शाह यांना हद्दपार करण्यासाठी राज गर्जना झली तर कधी हिंदुत्ववादी शाल पांघरून नरेंद्र मोदी यांच्या व्यासपीठावर जाऊन महायुतीची सहानुभूती मिळविली.

२८ नोव्हेंबर २०१९ रोजी ज्या उद्धव ठाकरे यांच्या मुख्यमंत्री पदाच्या शपथविधीसाठी मातोश्री कुंदाताई उर्फ मधुवंती ठाकरे यांच्या सह राज ठाकरे सहकुटुंब उपस्थित राहिले त्याच राज ठाकरे यांनी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या पक्षातून बाहेर पडल्याचे विस्मरण होत यंदाच्या निवडणुकीत उद्धव ठाकरे यांचा 'खरा गद्दार' असा केलेला उद्धार मातोश्री कुंदाताईंसह तमाम मराठी आणि हिंदूंना घायाळ करुन गेला.

आज उद्धव आणि राज ठाकरे या दोघांनी समोरचा गारदी ओळखून हातात हात घालून, खांद्याला खांदा मिळवून, तंगड्यात तंगड्या न घालता शिवसैनिक आणि महाराष्ट्र सैनिक यांना सोबत घेत महाराष्ट्र धुंडाळून काढण्याची गरज आहे, काळाची मागणी आहे, मराठी माणूस, हिंदू बांधव वाट पहातोय. शिवसेना आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना यांच्या उमेदवारांना मिळालेल्या मतांची बेरीज विजयी उमेवारापेक्षा जास्त होते याचे ठसठशीत उदाहरण ठाणे विधानसभा मतदारसंघात मिळालेल्या राजन विचारे (शिवसेना) आणि अविनाश जाधव (मनसे) यांच्या मतांची बेरीज संजय केळकर यांच्या मतांपेक्षा जास्त दिसून येते. दोघांच्या भांडणात तिसऱ्याचा फायदा होतो. हे टाळण्यासाठी आणि महाराष्ट्राच्या भल्यासाठी उद्धव आणि राज ठाकरे यांनी एकत्र येणे ही काळाची गरज आहे.

बेगडी हिंदुत्ववादी राजकारण्यांचा बुरखा टराटरा फाडून, राजकीय पर्यटन करणाऱ्या वाचाळवीरांना खड्यासारखे बाजूला टाकून पुनश्च हरी ओम करीत उभे रहा, ठाकरे बंधूंनी एकमेकांना साद घालण्याची, टाळी देण्यासाठी कोण पुढाकार घेईल याची वाट न पाहता मातोश्री ते शिवतीर्थ हे अंतर तोडून छत्रपती शिवाजी महाराज उद्यानातील त्यांच्या पायाशी विसावलेल्या शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मारकावर त्यांच्या आवडत्या चाफ्याच्या फुलांचा वर्षाव करीत चांदा ते बांदा कूच करावी. आई तुळजाभवानीचे आणि आई एकवीरेचे आशीर्वाद तुमच्या पाठीशी आहेत. उचला तो बेल भंडार आणि चला जनतेचा आशीर्वाद घेण्यासाठी.

बांधावरच्या शेतकऱ्यापासून तर चक्र चालवणाऱ्या मजूरापर्यंत आणि दीन दलित, दुबळ्या, रंजलेल्या, गांजलेल्या समाजातील शेवटच्या घटकांपर्यंत, आदिवासी, महिला सर्वांना तुमची आस आहे, सर्वांना तुमच्यावर विश्वास आहे तो सार्थ ठरविण्यासाठीची हीच योग्य वेळ आहे. मुंबई सह संयुक्त महाराष्ट्र लढ्याच्या वेळी सेनापती बापट म्हणाले होते, महाराष्ट्र मेला तरी राष्ट्र मेलेमहाराष्ट्राविना राष्ट्रगाडा न चालेखरा वीर वैरी पराधीनतेचा` महाराष्ट्र आधार हा भारताचा`' हेच लक्षात ठेवून करु या वाटचाल. जय महाराष्ट्र !

---

योगेश वसंत त्रिवेदी
मुंबई. ९८९२९३५३२१

■ ■ ■

### आतंकवादाचा निषेध आणि कठोर कारवाईची गरज!

वाचक लिहितात

"आतंकवादाला धर्म नसतो" असे आपण अनेकदा ऐकतो. मात्र, जेव्हा धर्म विचारून गोळ्या झाडल्या जातात, तेव्हा हा एक विशिष्ट समुदायच अशा प्रकारचे हल्ले करतो, हे स्पष्टपणे दिसून येते. याआधीही अनेकदा अशा हल्ल्यांचे प्रकार घडले आहेत आणि प्रत्येक वेळी पाकिस्तानने खतपाणी घातलेल्या संघटनांचा त्यामागे सहभाग असल्याचे सिद्ध झाले आहे. त्यामुळे आता पाकिस्तानला कठोर धडा शिकवणेच गरजेचे आहे. सरकारने यासाठी ठोस आणि कठोर पावले उचलली पाहिजेत, अशी नागरिकांची अपेक्षा आहे.

या घटनेविषयी सर्वसामान्य नागरिकांच्या मनात अजून काही प्रश्न निर्माण होतात. जसे, आतंकवादी भारतीय सैन्याचा गणवेश घालून आले होते तर, त्यांच्यापर्यंत तो गणवेश पोहोचला तरी कसा? त्यांच्यापर्यंत गणवेश पोहोचवण्याच्या कटात तेथील स्थानिक नागरिक सहभागी होते का, की अन्य कुणी? हा सर्व प्रकार गुप्तहेर खात्याच्या नजरेतून सुटलाच कसा? हे सगळे प्रश्न आज प्रत्येक भारतीय नागरिकाला सतावत आहेत आणि त्यांची उत्तरं मिळायला हवीत.

यासोबतच या घटनेतून पुन्हा एकदा हे स्पष्ट झाले आहे की, जर कोणीतरी आपल्या एका गालावर मारले, तर दुसरा गाल पुढे करायचा ही मानसिकता आता टाकून देण्याची वेळ आली आहे. तसेच सर्व हिंदूंनी आपापसातील जातपात विसरून, एकत्र येऊन एकसंध हिंदू म्हणून उभे राहणे ही काळाची गरज आहे.

■ सौ. प्रिया बागडदेव
छिंदवाडा.

# दह्यात मिसळा या ५ गोष्टी आणि चेहऱ्यावर लावा



उन्हाळ्यात आहारात दही समाविष्ट करणे फायदेशीर मानले जाते, परंतु त्वचेसाठी तसेच केसांसाठीही फायदेशीर आहे. दह्यामध्ये ग्लायसिन आणि प्रोलाइन अमीनो ॲसिड असतात जे कोलेजन तयार करण्यास मदत करतात. यामुळे त्वचा लवचिक, चमकदार राहते. दह्यामध्ये व्हिटॅमिन ए देखील असते जे त्वचा तरुण ठेवण्यासाठी आवश्यक असते. दह्यामध्ये प्रथिने, जस्त, तांबे, कॅल्शियम, व्हिटॅमिन बी कॉम्प्लेक्स, बी12, व्हिटॅमिन डी असे अनेक पोषक घटक आढळतात, त्यामुळे ते सेवन करण्यासोबतच चेहऱ्यावर लावल्यानेही अनेक फायदे होतात.

उन्हाळ्यात सूर्यप्रकाशामुळे त्वचा खराब होऊ शकते. चेहऱ्याला चमकदार बनवण्यासाठी त्याच्यावर दहीचा वापर केला जातो. दही थेट चेहऱ्यावर लावता येते. याशिवाय, त्यात काही गोष्टी मिसळून लावल्याने चेहरा उजळतो. उन्हाळ्यात होणाऱ्या पुरळ, टॅनिंग आणि पिंपल्ससारख्या त्वचेच्या समस्यांपासून मुक्तता मिळविण्यासाठी दही मदत करू शकते. तुम्ही चेहऱ्यावरील घाण आणि मृत त्वचा काढून टाकण्यासाठी आठवड्यातून एकदा त्वचेला एक्सफोलिएट करणे महत्वाचे आहे. यामुळे चेहरा चमकतो आणि ब्लॅकहेड्स आणि व्हाइटहेड्सची समस्या राहत नाही. यासाठी दह्यात कॉफी मिसळून चेहरा स्क्रब करता येतो. उन्हाळ्यात टॅनिंगची समस्या दूर करण्यासाठी दह्यात चिमूटभर हळद मिसळून दररोज रात्री झोपण्यापूर्वी लावू शकता. हात आणि पायांवरून टॅनिंग काढायचे असेल तर या पेस्टमध्ये थोडासा लिंबाचा रस देखील घालू शकता. उष्णतेमुळे चेहरा निस्तेज झाला असेल तर दह्यात मध मिसळून चेहऱ्यावर लावा. संध्याकाळी दह्यामध्ये कोरफडीचा रस मिसळून चेहऱ्यावर लावा. त्यात चिमूटभर हळदही घालता येते.

त्वचेची खोलवर स्वच्छता करणे खूप महत्वाचे आहे. यासाठी टोमॅटोचे दोन भाग करा आणि काही काळ फ्रीजमध्ये ठेवा. ते काढल्यानंतर, कापलेल्या भागावर दही लावा आणि काही मिनिटे गोलाकार हालचालीत चेहऱ्यावर हलक्या हाताने घासा. अशा प्रकारे त्वचा खोलवर स्वच्छ होईल आणि मऊ देखील होईल.

■ ■

अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



### सबका मालीक एक

ईश्वर म्हणा अल्ला म्हणा
की म्हणा तुम्ही वाहे गुरु
प्रत्येक प्रतिमेत त्याचाचअंश
हे नका हो आपण विसरू!

होईल याचा साक्षात्कार
ज्या दिवशी अंतर्मनात
धर्म पंथातील तंटे भौ
मिटतील क्षणार्धात ..!

तोच आहे सृष्टीचा राजा
आपण त्याची प्रजा
धर्मांध बनुनी नका हो
विश्वशांती भंग
करू राज्या ..!














## आज का अंदाज

सोमवार २८ एप्रिल २०२५
जबरदस्त पास होणारे चान्सेस
पत्थर फोड एकच

**कल्याण बाजार**

| | | | |
|---|---|---|---|
| 2 | 3 | 6 | 9 |
| 237 | 229 | 349 | 234 |
| 570 | 490 | 790 | 379 |
| 480 | 580 | 600 | 478 |
| 21 | 31 | 64 | 94 |
| 27 | 37 | 65 | 95 |
| 20 | 30 | 68 | 98 |

**मुंबई बाजार**


| | | | |
|---|---|---|---|
| 2 | 5 | 6 | 7 |
| 110 | 230 | 114 | 467 |
| 336 | 357 | 277 | 890 |
| 589 | 122 | 330 | 278 |
| 29 | 59 | 60 | 70 |
| 21 | 51 | 64 | 74 |
| 23 | 53 | 68 | 78 |

**२८ एप्रिल २०२५ सर्व बाजारांसाठी**

| | | | |
|---|---|---|---|
| 10 | 40 | 72 | 82 |
| 19 | 49 | 73 | 83 |
| 16 | 46 | 75 | 85 |

कल्याण, मुंबई आणि सर्व बाजारासाठी 60 पानांचा चार्ट मिळेल. 100 टक्के खात्रीशीर.
प्रो. बालाजी कुमार
9822486034


## शब्दकोडे क्रमांक २०९८




**आडवे शब्द :-**
२) एक रत्न
४) दूरदृष्टी, शहाणपण
६) महाराष्ट्रातील साडेतीन शक्तीपीठांपैकी एक असलेली देवी
९) पवित्र
११) शिव्याशाप
१३) भविष्य पाहण्याची एक विद्या
१४) पेरणी
१५) शंभर
१७) मनाचा ओढा
१८) महाराष्ट्राची राजभाषा
२०) उंट हाकणारा
२२) अभिप्राय
२३) पंख
२४) केस
२५) छोटी बैलगाडी
२६) चूक च्या विरुद्ध, सह
२८) कुजके पाणी
३१) शासन चालविणारा गट
३३) कणीदार
३६) जमिनीवरील कर
३८) कारस्थान
३९) अथवा, किंवा
४०) गोमाता
४१) हत्ती
४३) चलाख, हुशार
४५) स्वप्न (हिं )
४८) नुकतेच सरलेले दिवस
५०) सरळ वासा
५१) घेरी, भोवळ
५२) फिकीर, काळजी
५४) राजाची पत्नी
५५) विजयादशमी
५७) कौरव–पांडवांची कथा
५९) चालू दिवस
६२) पर्ण
६३) टप्प्याटप्प्याने केलेला प्रवास
६७) लोटी
६९) स्वस्तच्या विरुद्ध
७०) एक धान्य
७१) गुणाकार
७२) कमी पणा
७४) पाकळी, सैन्याचा विभाग
६५) वाईट
७६) मध्यस्थ
७७) सप्तस्वरातील पहिला स्वर
७८) गाढव

**उभे शब्द :-**
१) शंकराचे एक नाव,
२) फायदेशीर
३) एक ज्वालाग्रही पदार्थ
४) बैलाचा सण
५) सुंदर तरुणी
६) भराव
७) डावा
८) शनीचे रत्न
९) एक चतुर्थांश
१०) रवाळ
१२) सूर्य
१४) सोटा, काठी
१६) अगदी त्याप्रमाणेच
१९) उघड उघड, बिनदिक्कतपणे
२१) उपयोग
२२) राज्ञी
२३) परकीय, दुसरा
२४) पळसाचा डिंक
२७) भरभराट
२८) तोटी,
२९) मेहनत
३०) बटवा
३२) रड्या मनुष्य
३४) बटवडा
३५) वेडा
३७) रात्रीचा पाऊस
४२) जपजाप्य
४४) अस्वल
४६) रागी, नागली
४७) कळलाव्या मुनी
४८) थरथरणारा आवाज
४९) लक्ष्मीचे एक नाव
५३) दशक
५४) राजवाडा
५६) युद्ध
५७) हात आणि पंजा यांना जोडणारा अवयव
५८) हमाल
६०) पाणी
६१) सध्या
६४) दुनिया
६५) धाक, वचक
६६) माझा
६८) त्वरित
६९) हत्तीच्या गंडस्थळातील स्राव
७१) अधिकाराचे स्थान
७३) बोटावरचे कडक आवरण

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



# मनपाने राबविली नंदिनी स्वच्छतेसाठी मोहीम

## माझी वसुंधरा सप्ताह स्वच्छता अंतर्गत उपक्रम

- माझी नंदिनी, माझी जबाबदारीतून स्वच्छता
- ईलाइट क्लब ऑफ नाशिक संस्थेचा सहभाग
- १०० हून अधिक स्वयंसेवकांनी केले श्रमदान
- विद्यार्थी, स्वयंसेवकांनी केली पर्यावरण संरक्षणाची प्रतिज्ञा
- ५०० किलोहून अधिक कचरा संकलन अन् विल्हेवाट







**नाशिक ।** महानगरपालिकेने जागतिक "माझी वसुंधरा सप्ताह" साजरा करताना "वसुंधरा वाचवा, वसुंधरा सजवा" या ब्रीदवाक्यानुसार "माझी नंदिनी, माझी जबाबदारी" ही विशेष नदी स्वच्छता मोहीम यशस्वीपणे राबवली.

या उपक्रमाचे स्वागत करताना अतिरिक्त आयुक्त करिष्मा नायर यांनी महानगरपालिका नदी संवर्धनासाठी कटिबद्ध असल्याचे स्पष्ट केले. त्यांनी नागरिकांना देखील नदी स्वच्छतेमध्ये सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन केले. "नदी आपली जीवनदायिनी आहे. तिचे रक्षण करणे आपली सामूहिकग जबाबदारी आहे," असे त्यांनी सांगितले. या मोहिमेमध्ये "ईलाइट क्लब ऑफ नाशिक" या सामाजिक संस्थेने पुढाकार घेतला. महानगरपालिका शिक्षण विभाग व स्वच्छता विभाग यांच्या सहकार्याने १०० हून अधिक स्वयंसेवकांनी नंदिनी नदी पात्रातील ५०० किलोपेक्षा अधिक कचरा गोळा केला. संकलित कचऱ्याची विल्हेवाट महानगरपालिकेच्या माध्यमातून करण्यात आली. कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी अतिरिक्त आयुक्त करिष्मा नायर यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी व स्वयंसेवकांनी "माझी वसुंधरा, माझी जबाबदारी" या संकल्पनेखाली पर्यावरण संरक्षणाची प्रतिज्ञा केली. यावेळी त्यांनी पर्यावरण संवर्धन, स्वच्छ व हरित जीवनशैली आणि आगामी हरित कुंभबाबत मोलाचे मार्गदर्शन केले. ही संपूर्ण मोहीम कर उपायुक्त तथा घनकचरा व्यवस्थापन संचालक अजित निकत व उपायुक्त पर्यावरण तथा गोदावरी संवर्धन नितीन पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

यावेळी महानगरपालिका शिक्षण विभाग, घनकचरा विभाग व मनपाचे विविध विभागाचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. नाशिक महापालिकेच्या या उपक्रमामुळे नंदिनी नदी स्वच्छतेबाबत सकारात्मक जनजागृती निर्माण झाली असून, पर्यावरण रक्षणासाठी नागरिकांमध्ये जागृत निर्माण झाली असल्याचे दिसून आले.

## ➤ महत्त्वाचे

### 'एका इंजिनियरची गोष्ट' पुस्तकाचे प्रकाशन संपन्न

**नाशिक ।** अत्यंत गरीब परिस्थितीतून वर आलेल्या विनजीत टेक्नॉलॉजीचे असो.



वाईस प्रेसिडेंट विशाल अवचिते यांनी आपल्या सहजीवनावर आधारित लिहिलेल्या 'एका इंजिनिअरची गोष्ट' या पुस्तकाचे प्रकाशन नुकतेच मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांच्या हस्ते सह्याद्री बंगला मुंबई येथे झाले. विशाल अवचिते यांनी अत्यंत गरीब परिस्थितीतून शिक्षण घेऊन असो. व्हाईस प्रेसिडेंट पदापर्यंतचा प्रवास कसा पार केला. याचे जिवंत चित्र उभं केलेले स्वलिखित पुस्तक म्हणजेच इंजिनीयर ची गोष्ट... अशिक्षित आई-वडिलांच्या पोटी झोपडपतीत जन्म घेतलेल्या एका तरुण युवकाला शिक्षणातून यशाची उंच शिखरे गाठताना त्याच्या आयुष्यात आलेले कठीण प्रसंग, त्यावर त्याने केलेलि मात, मोलमजुरी करणाऱ्या वडिलांच्या कष्टाची जाण ठेवून आपले ध्येय कसे गाठले. याचे सर्व जिवंत चित्र या पुस्तकात त्यांनी मांडले आहे... विशाल अवचिते यांनी स्वजीवनावर आधारित लिहिलेल्या या पुस्तकातून तरुण युवकांना करिअरमध्ये मार्गदर्शन करण्यासाठी हे पुस्तक उपयोगी आणि प्रेरणादायी ठरेल, असे देवेंद्र फडवणीस यांनी सभागृहात आपले मत व्यक्त करतांना सांगितले. या पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्याप्रसंगी आमदार देवयानी फरांदे तसेच मुंबई पोलीस डीसीपी प्रशांत परदेशी, शिक्षण खात्यातील भूपेंद्र शुक्ला आदी उपस्थित होते.

### संविधान भवनासाठी 'ती' जागा देण्याची आ. फरांदेची मागणी

**नाशिक ।** शहरातील मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या सर्वे क्रमांक ६४३ब ही शासकीय जागा संविधान भवनासाठी उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी आमदार प्रा. देवयानी फरांदे यांनी केली आहे. या संदर्भात त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे पत्रही दिले आहे. पत्रात नमूद केल्यानुसार शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याशेजारी असणारी ही जागा शासकीय आहे. ही जागा शासनाने दिली होती. त्या कारणासाठी जागेचा वापर होत नसल्यामुळे २००३ ला जागेचा शर्तभंग प्रस्ताव करून जागा शासन जमा करण्याची प्रक्रिया पूर्ण झालेली होती. यानंतर ही जागा बांधकाम व्यावसायिकाला देऊन जमीन गिळंकृत करण्याचा प्रयत्न सुरू झाला होता. त्यामुळे प्रस्ताव प्रलंबित होता. आमदार फरांदे यांनी अर्थसंकल्प अधिवेशनात याबाबत लक्षवेधी मांडत विषय उपस्थित केला होता. शर्तभंग प्रस्ताव मंजूर झालेला असून, केवळ जमिनीला नाव लावणे बाकी आहे, असे उत्तर त्यावेळी मिळाले होते. संविधान भवनासाठी केंद्र शासनाने मंजुरी दिलेली असून, जागेअभावी काम सुरू होत नाही म्हणून ही जागा देण्याची मागणी केली आहे.

# जागतिक हिवताप दिनानिमित्त जनजागृती फेरी; कार्यक्रम






**नाशिक ।** जागतिक हिवताप दिनाच्या निमित्ताने शुक्रवारी (दि. २५) सकाळी जिल्हा रुग्णालय येथून आरोग्य सहा. संचालक (हिवताप) यांच्या अध्यक्षतेखाली हिवताप जनजागृती फेरी काढण्यात आली होती.

सदर फेरीमध्ये जिल्हा हिवताप कार्यालयाचे अधिकारी व कर्मचारी, जिल्हा रुग्णालयाचे अधिकारी व कर्मचारी, सार्वजनिक आरोग्य (मलेरिया) विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. सदर फेरीमध्ये अधिकारी व कर्मचारी यांचे मार्फत हिवताप प्रतिबंधात्मक जनजागृतीबाबत फलक दाखवुन नागरिकांमध्ये जनजागृती पर संदेश देण्यात आले. त्याचाच एक भाग म्हणून नाशिक महारपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य (मलेरिया) विभागाच्यावतीने राजीव गांधी भवन येथून अतिरिक्त आयुक्त करिश्मा नायर यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम साजरा करण्यात आला. यावेळी त्यांनी हिवताप प्रतिबंधात्मक कार्यवाही करीता प्रत्येक नागरिकाने जबाबदारीने काळजी घेण्याचे आवाहन केले. या कार्यक्रमास उपायुक्त नितीन पवार, मुख्यलेखा परिक्षक बळवंत गायकवाड, मुख्य लेखा व वित्त अधिकारी दत्तात्रय पाथरुट, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. तानाजी चव्हाण, सहा. वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. प्रशांत शेटे व डॉ. अजिता साळुंके, जिल्हा हिवताप अधिकारी नाशिक डॉ.एस.एस. पिवळतकर, जीवशास्त्रज्ञ डॉ. नितीन रावते, जनसंपर्क अधिकारी योगेश कमोद, हिवताप पर्यवेक्षक गिरीष चौधरी व किशोर पगार, मलेरिया विभागाचे अधिकारी व कर्मचारी, जिल्हा हिवताप कार्यालयाचे अधिकारी व कर्मचारी यांचे उपस्थित होते.

या वेळी हिवताप दिनानिमित्ताने हिवताप निर्मूलनाची शपथ देण्यात आली व मलेरिया विभागात उत्कृष्ट काम करणाऱ्या १५ कर्मचारी यांचा सन्मान करण्यात आला. मलेरिया गोडावुन, द्वारका येथे मनपा हद्दीतील डास निर्मुलनाचे चांगले कामकाज करणारे पेस्ट कंट्रोल कंत्राटी कर्मचारी यांना त्यांचे कंत्राटदाराने गौरव पत्र देऊन सन्मानित केले. या कार्यक्रमांतर्गत प्रत्यक्ष स्वच्छतेबरोबरच जनजागृतीकरीता संदेश देणारे विविध हिवताप प्रतिबंधात्मक पत्रके, स्टिकर वाटप करण्यात आले व डास अळी, नॉयलॉन जाळीचे प्रदर्शन सादर करण्यात आले. जसे आपल्या घरातील फुलदानी व शोभीवंत झाडांचे पाणी नियमित पणे पाणी बदलावे, फ्रिज डी फ्रॉस्ट ट्रे चे साचलेले पाणी आठवड्यात एकदा काढून टाकावे, अनावश्यक वस्तु जसे प्लॉस्टिकचे कप, पाण्याच्या रिकाम्या बाटल्या, करवंट्या, टार्यर, रंगाचे डबे यासारखे काढून टाकावे, घर परिसरात पाणी साचु देऊ नये, नविन बांधकाम सुरु असलेल्या ठिकाणी पाणी साचुन त्यामध्ये डास उत्पत्ती होणार नाही यांची काळजी घ्यावी, ताप आल्यानंतर त्वरीत रुग्णास मनपा दवाखाने, शासकीय रुग्णालय येचुन उपचार करुन घ्यावेत. कार्यक्रमाअंती नाशिक महानगरपालिकेतर्फे या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जनसंपर्क अधिकारी योगेश कमोद यांनी केले तर जीवशास्त्रज्ञ डॉ. नितीन रावते, यांनी आभार व्यक्त केले.

# विंचूरला दहशतवादी हल्ल्याच्या निषेधार्थ कडकडीत बंद




**विंचूर ।** पहेलगाम येथे दहशतवाद्यांनी केलेल्या भ्याड हल्ल्याचा तीव्र निषेध करीत ग्रामस्थांनी कडकडीत बंद पाळला.

विंचूर शहरात कडकडीत बंद पाळत निषेध व्यक्त करण्यात आला. जम्मू-काश्मीर येथील पहेलगाम येथे अतिरेक्यांनी भारतीय पर्यटकांवर गोळीबार केल्याने २८ पर्यटकांचा मृत्यू झाला. त्यांनी त्यांचा धर्म विचारून त्यांची हत्या करण्यात आली. केंद्र सरकारने कठोर पावले उचलून अतिरेक्यांना कंठस्नान घालावे हा दहशतवादी हल्ला घडवून आणणाऱ्या संघटनांच्या अतिरेक्यांना कठोरातील कठोर शासन करावे, अशी मागणी करण्यात आली. यावेळी विंचूर, विष्णुनगर, गुंजाळवाडी, किसनवाडी सुभासनगर येथील ग्रामस्थांनी विंचूर शहर कडकडीत बंद पाळून आपला निषेध व्यक्त केला. यावेळी पोलीस ठाण्याला निवेदन देण्यात आले.

# 'नरडेको' नाशिक कार्यकारिणीची महत्वपूर्ण बैठक संपन्न



नरेडको नाशिक आयोजित कार्यकारिणी समितीच्या बैठकीत मा. अजित दान, अतिरिक्त आयुक्त, सीजीएसटी आणि केंद्रीय उत्पादन शुल्क, नाशिकचे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. नरेडकोच्या दर महिनांच्या कार्यकारिणी समिती बैठकीस एका शासन प्रतिनिधी यांना आमंत्रित करण्याची रचना २०२४-२६ या कार्यकारिणीने सुरु केलेली आहे. कालच्या समिती बैठकीस अजित दान साहेब यांनी उपस्थित नरेडको समिती सदस्यांना जीएसटीच्या विविध रचनेविषयी मार्गदर्शन केले.

**नाशिक ।** नरेडको नाशिकच्या ११व्या कार्यकारिणी समितीची महत्त्वपूर्ण बैठक यशस्वीरित्या पार पडली. या बैठकीस अतिरिक्त आयुक्त, सीजीएसटी आणि केंद्रीय उत्पादन शुल्कचे अतिरिक्त आयुक्त अजित दान विशेष अतिथी म्हणून उपस्थित राहिले. त्यांच्या उपस्थितीमुळे बैठकीला विशेष महत्त्व प्राप्त झाले.

या बैठकीत विविध धोरणात्मक विषयांवर चर्चा झाली. तसेच रिअल इस्टेट क्षेत्राशी संबंधित कर प्रणाली, जीएसटी संदर्भातील मुद्दे आणि विकासाच्या संधी याविषयी अजित दान यांनी सखोल मार्गदर्शन केले. त्यांनी नरेडकोच्या सदस्यांशी थेट संवाद साधत त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या आणि प्रशासनाच्या पातळीवर सहकार्याची ग्वाही दिली. नरेडको नाशिकचे अध्यक्ष सुनील गवादे, सचिव शंतनु देशपांडे, कोषाध्यक्ष भूषण महाजन, मार्गदर्शक जयेश ठक्कर तसेच सर्व कार्यकारिणी सदस्यांनी अजित दान यांचे स्वागत करत त्यांचे आभार मानले.

या बैठकीस नरेडको कार्यकारिणी समितीचे ३० सदस्य तसेच आयसीएआय (CA) नाशिक शाखा अध्यक्ष, जिंतेंद्र फापड, खजिनदार, विशाल वाणी. सनदी लेखापाल अनिल कोठावदे, पुष्कर डास व नरेडको पॅनलचे तुषार लोखंडे (CA) यांनी सहकार्य केले. नरेडको नाशिक नेहमीच प्रशासनाशी सकारात्मक संवाद साधून नाशिक शहराच्या आणि उद्योगाच्या प्रगतीसाठी कार्यरत राहणार असल्याचे या बैठकीतून आग्रहाने मांडण्यात आले.

# गुजरातमधील जुळ्या बहिणींचा जुळा निकाल!

गुजरातमधील सुरत येथील जुळ्या रीबा आणि राहिन हाफेजी यांनी एमबीबीएस अंतिम परीक्षेत समान गुण मिळवले. दोघींनाही ६६.८ टक्के गुण मिळाले. या मुलींनी कोचिंगशिवाय नीट-यूजी उत्तीर्ण केले. राहिनला शस्त्रक्रियेची आवड आहे तर रीबाला औषधांमध्ये रस आहे. या २४ वर्षांच्या बहिणींचे शिक्षण आणि आयुष्याचे निर्णय नेहमीच सारखेच राहिले आहेत. त्याची आई गुलशाद बानू शिक्षक असून तिने दोघींनाही एकटीने वाढवले. या दोन बहिणींना अनेक आर्थिक अडचणींचा सामना करावा लागला.



पण त्यांनी ध्येय सोडले नाही. त्यांना कुटुंबातील पहिली डॉक्टर बनण्याचे होते. कोणत्याही खासगी क्लासशिवाय दोन्ही बहिणींनी नीट-यूजी वैद्यकीय प्रवेश परीक्षेत चांगली कामगिरी केली. रीबाला ९७ पर्सेंटाइल आणि राहीनला ९७.७ पर्सेंटाइल मिळाले.

**मेडिकल करण्याचा निर्णय**

राहिन म्हणते की, तिचे मामा डॉक्टर आहेत. त्यांच्याकडून प्रेरणा घेऊन तिने वैद्यकीय विषय शिकण्याचा निर्णय घेतला. लहानपणीही आम्हा दोघींना सारखेच गुण मिळायचे. त्या एकाच वसतिगृहाच्या खोलीत राहत होत्या आणि एकत्र लेक्चर अटेंड करत होत्या. रीबा म्हणते की, त्यांना जामनगर किंवा भावनगरच्या सरकारी वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये प्रवेश मिळू शकला असता. पण दोघींनाही एकत्र राहायचे होते, म्हणून त्यांनी २०१९ मध्ये जीएमईआरएस कॉलेज निवडले. ते सुरतजवळ आहे. अर्थात शहराबाहेर एकटे राहण्याची त्यांची ही पहिलीच वेळ होती. या बहिणी म्हणतात की, त्यांना आई आणि आजी-आजोबांकडून खूप पाठिंबा मिळाला आहे.

**स्वप्नपूर्तीचा आनंद**

राहिनने सांगितले की, आम्ही अनेक चढउतार पाहिले आहेत. पण आई आणि आजी-आजोबा नेहमीच आमच्यासोबत राहिले आहेत. त्याचे स्वप्न पूर्ण करू शकलो याचा आम्हाला आनंद आहे. राहिनच्या मते, सरकारी शिष्यवृत्ती आणि इतर आर्थिक मदतीमुळे त्यांना महाविद्यालयीन शिक्षण घेण्यास फारशी अडचण आली नाही. प्रसूतीशास्त्र आणि स्त्रीरोगशास्त्रासारख्या शस्त्रक्रियेत मोठे शिक्षण घ्यायचे आहे, असे राहिन म्हणते तर रीबाला औषधांमध्ये रस आहे. पण दोघींनाही एकाच कॉलेजमधून पदव्युत्तर शिक्षण घ्यायचे आहे.

# टार्गेट पूर्ण न केल्याने कर्मचाऱ्याला बनवले कुत्रा!

कॅलिडोस्कोप

केरळमध्ये टार्गेट पूर्ण न केल्याने व्यवस्थापकाने कर्मचाऱ्याला कुत्र्यासारखे फिरवले! गळ्यात पट्टा घालून त्याला दोन पाय आणि हातावर चालायला लावले.

तुम्ही कामाला असाल तिथे पगारासह सन्मान देणे हे कंपनीचे कर्तव्य आहे. मात्र कंपन्यांचा क्रूर चेहरा समोर आल्यावर अनेक प्रकारचे प्रश्न लोकांच्या मनात निर्माण होतात. महिन्याच्या पगारासाठी रात्रंदिवस मेहनत करून कंपनीला नव्या उंचीवर नेणाऱ्या कर्मचाऱ्याला मान नाही का? असे प्रश्न केरळमधील या उदाहरणावरून निर्माण होतात. आता कंपनीकडून कर्मचाऱ्याने कंपनीचे ठरवलेले टार्गेट पूर्ण केले नसल्याचा दावा केला जात आहे.

**पोलिसांची चौकशी सुरू**

टार्गेट पूर्ण न केल्याच्या रागातून या संबंधित व्यवस्थापकाने कर्मचाऱ्याला कुत्रा बनवले आणि त्याच्या गळ्यात पट्टा बांधून कार्यालयात फिरवले जात असल्याचा व्हिडीओ सौशल मीडियात फिरतो आहे. काम वेळेत न पूर्ण केल्यामुळे त्याला अशी अपमानास्पद शिक्षा देण्यात आली आहे. पोलिसांचे म्हणणे आहे की कंपनीच्या माजी व्यवस्थापकाचा कंपनीच्या मालकाशी वाद झाला आणि त्यानंतर त्याने नवीन प्रशिक्षणार्थींसोबत असे वर्तन केले. हा कंपनीच्या प्रशिक्षणाचा एक भाग असल्याचा दावा केला जात आहे. आता असे वागणाऱ्या व्यवस्थापकाने कंपनी सोडली आहे.



**कारवाई सुरू**

कुत्र्याचा पेहराव केलेल्या कर्मचाऱ्यासोबत आणखी एक माणूस चालताना आणि सिट-अप करताना दिसत आहे. हा व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर केरळच्या कामगार विभागाने कामाच्या ठिकाणी कर्मचाऱ्यांच्या कथित छळाच्या चौकशीचे आदेश दिले असून या प्रकरणाचा अहवाल मागवला आहे. या प्रकरणी पोलिसांनी माजी व्यवस्थापकाला जबाबदार धरले आहे.

# असा होतो क्षमतेचा गैरवापर

क्रेडिट कार्ड, ऑनलाईन व्यवहारांबाबतच्या गैरप्रकारांमध्ये, फसवणुकीमध्ये बरीच वाढ होते आहे. हा प्रकार फक्त भारतातच घडतो असं नाही तर जगभरातच ही समस्या आ वासून उभी आहे. मध्यंतरी जपानमध्ये अशीच एक घटना घडली. इथल्या एका मॉलमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्याने १३०० लोकांच्या क्रेडिट कार्डाचे नंबर लक्षात ठेऊन बरीच खरेदी केली. युसुके तानीगुची असं या कर्मचाऱ्याचं नाव आहे. त्याला क्रेडिट कार्डाची माहिती चोरून गैरप्रकार केल्याच्या आरोपाखाली अटक करण्यात आली. तानिगुचीचा मेंदू खूपच तल्लख असल्यामुळे तो क्रेडिट कार्डांचे नंबर लक्षात ठेवत असे. इतकंच नाही तर वापरकर्त्याचं नाव, कार्डाची अंतिम तारीख, सीव्हीसी क्रमांक त्याच्या लक्षात रहायचे. त्याने या क्षमतेचा वापर गैरप्रकार करण्यासाठी केला. या माहितीच्या आधारे त्याने ऑनलाईन खरेदी केली. अशाच एका खरेदीदरम्यान त्याची चोरी पकडली गेली. तानीगुचीच्या घरात एक वही सापडली असून त्यात बऱ्याच कार्डांचे नंबर आणि इतर माहिती आढळली. तानीगुचीने आपल्या बौद्धिक क्षमतेचा गैरवापर केल्याच्या प्रतिक्रिया सोशल मीडियावर दिल्या जात आहेत.




# राजधानी बदलाचा इतिहास



बऱ्याच देशांनी विविध कारणांमुळे आपल्या राजधान्या बदलल्या आहेत. कोणे एके काळी कलकत्ता ही भारताची राजधानी होती. मात्र १९३१ मध्ये दिल्लीला राजधानीचा दर्जा देण्यात आला. भौगोलिकदृष्ट्या दिल्ली देशाच्या मध्यभागी असल्याने आणि विविध ठिकाणांहून दिल्लीला सहजपणे जाता येत असल्याने हा निर्णय घेण्यात आला. इंडोनेशियाही आपली राजधानी बदलण्याच्या तयारीत आहे. या देशाची सध्याची राजधानी जकार्ता भविष्यात पाण्याखाली जाणार आहे. ही प्रक्रिया सुरू झाली आहे. त्यामुळे या शहरात वाहतुकीच्या समस्या निर्माण झाल्या आहेत. हे लक्षात घेता हा देश बोर्नियो नामक बेटावर नवी राजधानी वसवण्याच्या तयारीत आहे. कझाकिस्तान या देशानेही आपली राजधानी बदलली. १९९१ मध्ये सोव्हियत युनियनपासून वेगळं झाल्यानंतर अलमातीला राजधानीचा दर्जा देण्यात आला. पण या शहराशी संबधित बऱ्याच समस्या होत्या. त्यातच हे शहर भूकंपप्रवण भागात येत असल्यामुळे अस्तानाला नवी राजधानी वसवण्यात आली. आता हे शहर नूर सुल्तान या नावाने ओळखलं जातं. एकेकाळी रंगून ही म्यानमारची राजधानी होती. मात्र २००५ मध्ये इथल्या लष्कराने देशाची राजधानी नैप्यीदाला नेली. यामागचं नेमकं कारण स्पष्ट करण्यात आलेलं नाही. ब्राझीलनेही आपली राजधानी बदलली होती. जवळपास २०० वर्षं रिओ डी जेनेरो ही ब्राझीलची राजधानी होती. मात्र १९६० मध्ये ब्राझिलियाला राजधानीचा दर्जा देण्यात आला. रिओ डी जेनेरोला प्रचंड गर्दी असल्यामुळे हा निर्णय घेण्यात आला.

# पिवळ्या रंगावर काळी अक्षरे का?




देशभरात दररोज २२,५९३ रेल्वे धावतात. त्यात सुमारे १३,४५२ प्रवासी गाड्यांचा समावेश आहे. या माध्यमातून लाखो लोक प्रवास करतात. भारतातील सर्वात मोठे रेल्वे स्टेशन हावडा आहे. सर्वात व्यस्त रेल्वे स्थानकांच्या यादीतही त्याचा समावेश आहे.

भारतात एकूण रेल्वे स्थानकांची संख्या ७,३४९ आहे. भारतातील काही रेल्वे स्थानकांची नावे खूपच आश्चर्यकारक आहेत. परंतु आपल्या देशात अशा रेल्वे स्थानकांची कम तरता नाही, ज्यांची नावे वाचल्यानंतर किंवा ऐकल्यानंतर हसू आवरणार नाही. तूर्तास हा विषय मागे ठेवू या. पण रेल्वे स्थानकांची नावे पिवळ्या बोर्डांवर काळ्या रंगात का लिहिली जातात? हे जाणून घेऊ या. तर मंडळी, याम ागे एक नाही तर अनेक कारणे आहेत.

**सतर्कतेचा संदेश**

रेल्वे स्टेशनचे नाव पिवळ्या बोर्डवर काळ्या अक्षरात लिहिण्याचे पहिले कारण म्हणजे पिवळा रंग खूप चमकदार रंग आहे. त्यामुळे रेल्वे चालकाला तो दुरूनच दिसतो. याशिवाय, पिवळा रंग थांबण्याचे संकेत देतो. पिवळे बोर्ड ट्रेनच्या लोको पायलटला वेग कमी करण्याचा किंवा सतर्क राहण्याचा इशारा देतो. अनेक रेल्वे स्थानकांवर गाड्या थांबत नाहीत, अशा गाड्यांचे लोको पायलट स्टेशनमध्ये प्रवेश केल्यापासून बाहेर पडेपर्यंत खूप सतर्क राहतात आणि सतत हॉर्न वाजवत राहतात. यामुळे स्टेशनवर उपस्थित प्रवासी सतर्क होतात.

**दुरून दिसण्यासाठी**

पिवळा रंग इतर रंगांपेक्षा खूपच प्रभावी असून रात्रीच्या अंधारातही तो दुरून दिसतो. याशिवाय, हे रंग डोळ्यांना खूप आराम देतात. पिवळ्या बोर्डवर काळ्या रंगात लिहिलेली स्टेशनची नावे दुरूनच दिसतात. या कारणांमुळे अशी रचना केलेली दिसते.

# मुलीच्या लग्नाआधीच आई जावयाबरोबर पसार

प्रेमाला वय किंवा मर्यादा नसते. प्रेम नात्यांकडे पाहत नाही ना प्रसंगाकडे त्याचे लक्ष असते. या संदर्भात अलीगढमधील एक धक्कादायक घटना सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. मुलीच्या लग्नाची तारीख जवळ येत होती तसतसे सून आणि जावयातील प्रेम वाढत होते. याचा परिणाम असा झाला की, लेकीचे लग्न होण्यापूर्वीच सासू जावयासह घरातून पळून गेली.

संबंधित प्रकरणी सासू आणि जावई तास न तास फोनवर एकमेकांशी बोलत असत. मद्रक पोलिस ठाण्याच्या हद्दीतील मनोहरपूर गावात जितेंद्र नावाच्या व्यक्तीने पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे, की जावई त्यांच्या पत्नीसह पळून गेला आहे. सासू जावयासह घरातून सुमारे ५० हजार रुपये घेऊन पळून गेल्याची माहिती आहे. सोन्या-चांदीच्या दागिन्यासह पाच लाख रुपयांचा ऐवज घेऊन ती जावयाबरोबर फरार झाली.

**स्मार्टफोनची किमया**

झाले असे की, सासूने आपल्या होणाऱ्या जावयाला स्मार्टफोन भेट म्हणून दिला होता. यातूनच दोघे सतत बोलत असत. या बाईच्या लेकीचे लग्न १६ एप्रिलला होणार होते; परंतु त्याअगोदरच जावई आणि सासू हे दोघे पसार झाले. जितेंद्र कुमार म्हणतात, की मुलीच्या लग्नाची सगळी तयारी पूर्ण झाली होती. मुलीला सन्मानाने घरी पाठवण्याचे त्यांचे स्वप्न होते. मात्र अचानक त्यांची पत्नी घरातून गायब झाली. सुरुवातीला ती कोणत्यातरी नातेवाइकाच्या घरी गेली असावी असे वाटले; मात्र ती न परतल्याने शोध सुरू करण्यात आला. तिकडे मुलीचा होणारा नवराही घरातून बेपत्ता असल्याचे समजले. यानंतर मोबाईल डिटेल्स काढले असता कुटुंबीयांना धक्का बसला.



# अत्तराच्या वासामुळे महिला विमानातच भिडल्या


विमानातील दोन प्रवाशांमध्ये अंगाचा आणि परफ्यूमचा वास यावरून झालेल्या वादाला हिंसक वळण लागले. त्यात फ्लाइट अटेंडंट जखमी झाला. शरीराच्या दुर्गंधीवरून प्रवाशांमध्ये झालेल्या भांडणात फ्लाइट अटेंडंटच्या हाताला प्रवाशाने चावा घेतला. शरीराच्या दुर्गंधीवरून दोन महिला प्रवाशांमध्ये भांडण झाले. एका महिला प्रवाशाने दुसरीच्या शरीराच्या दुर्गंधीवर अस्वस्थता व्यक्त केल्यावरुन हाणामारी सुरू झाली, तर दुसरीने पहिलीच्या अत्तराच्या तीव्र वासावर आक्षेप घेतला. या वादाचे रुपांतर मारामारीत झाले. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी आलेल्या फ्लाइट अटेंडंटवर हल्ला करण्यात आला. त्याच्या हाताला चावा घेतला गेला आणि आणखी एका प्रवाशालाही ओरखडे आले.



**भांडणामुळे विमान दोन तास लेट**

विमान कंपनीने या घटनेची पुष्टी केली असून जखमी फ्लाइट अटेंडंटला किरकोळ दुखापत झाल्यामुळे ताबडतोब रुग्णालयात दाखल करण्यात आल्याचे सांगितले आहे. आता तिची प्रकृती स्थिर आहे. या प्रवासी म हिलांमध्ये वाद सुरू झाल्यावर दोन महिला फ्लाइट अटेंडंट आणि दोन पुरुष सहकाऱ्यांनी भांडण थांबवण्याचा प्रयत्न केला. पण यामध्ये एकजण जखमी झाली. घटनेनंतर दोन्ही प्रवाशांना पोलिसांनी ताब्यात घेतले. प्रवासाचा पहिला टप्पा संपल्यानंतर फ्लाइटमधील इतर प्रवाशांना उतरवण्यात आले आणि नंतर फ्लाइट दोन तासांच्या विलंबाने निघाली. विमानाला उशीर झाल्याने उर्वरित प्रवाशांना त्रासाला सामोरे जावे लागले.


# करांची करकिर



आपण आयकर भरतो. पाणीपट्टी, घरपट्टी तसंच इतर विविध माध्यमातून कर वसूल केला जातो. पण तुम्ही कधी उन्हासाठी किंवा सावलीसाठी कर भरला आहे का? नाही ना, पण काही देशांमध्ये यासाठीही कर घेतला जातो. जगभरातल्या अशाच काही विचित्र करपद्धतींविषयी...

✻ अमेरिकेतल्या ऑर्कन्स राज्यात शरीरावर टॅटू गोंदवल्यास सहा टक्के कर भरावा लागतो.

✻ स्पेनमधल्या बॅलरिक बेटांवर २०१६ पासून सन टॅक्स वसूल केला जातो. युरोपातल्या देशांमध्ये सूर्यप्रकाश खूप कमी काळ असतो. म्हणूनच मुबलक सूर्यप्रकाश असणाऱ्या या ठिकाणी पर्यटकांची बरीच गर्दी होते. त्यांच्याकडून हा कर घेतला जातो.




✻ अमेरिकेत २०१० पासून टॅनिंग टॅक्स वसूल केला जातो. पाश्चिमात्य देशांमध्ये त्वचेच्या कर्करोगाचं प्रमाण वाढत चाललं आहे. या कर्करोगाला आळा घालण्यासाठी टॅनिंग कर वसूल केला जात आहे.

✻ हंगेरीत २०११ पासून डबाबंद खाद्यपदार्थांम ध्ये साखर आणि मीठाचं प्रमाण जास्त असणाऱ्या कंपन्याकडून कर वसूल केला जातो.

अमेरिकेतल्या अलबामा राज्यात पत्त्याचा कॅट खरेदी करणाऱ्यांकडून कर वसूल केला जातो.

# मुलांच्या हाती रेल्वेची जबाबदारी



एखाद्या रेल्वेस्थानकाची सगळी जबाबदारी महिला सांभाळत असल्याचं तुम्ही ऐकलं असेल. पण रेल्वेस्थानकावरची सगळी कामं लहान मुलं करत असल्याचं फारसं ऐकिवात नसेल. मात्र हंगेरीची राजधानी बुडापेस्टमधल्या डोंगराळ भागातल्या जंगलात असणाऱ्या एका रेल्वे स्थानकावर सगळी कामं करण्यासाठी लहान मुलांची नियुक्ती करण्यात आली आहे. गार्ड, स्टेशन मास्टर, तिकिट तपासनीस, तिकिट खिडकीवरचे कर्मचारी म्हणून ही मुलंच काम बघतात. इथे काही मुलं गणवेशात असतात तर काही गणवेशाशिवायही काम करतात. या रेल्वे स्थानकावरून विशेष ट्रेन धावते. ही ट्रेन ४० मिनिटांमध्ये ११ किलोमीटर अंतर कापते. ४० ते ५० प्रवासी या ट्रेनम ध्ये बसू शकतात. इथे फारशी वर्दळ नसते. काही लोक फक्त मुलांचं काम बघण्यासाठी इथे येतात. एकेकाळी हंगेरी हा सोव्हियत युनियनचा भाग होता. त्यावेळी मुलांना जबाबदारीची जाणीव करून देण्यासाठी ङ्गपायोनिअर रेल्वेफ सुरू करण्यात आली होती. त्या काळी प्रौढांसोबत मुलंही इथे काम करायची. हंगेरी स्वतंत्र झाल्यानंतरही या स्थानकावर ही प्रथा सुरू ठेवण्यात आली आहे.

# पहलगाम हल्ला देशविरोधी, त्यावर राजकारण नको: शरद पवार



**सिंधुदुर्ग, दि. २७ प्रतिनिधी**

जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे पर्यटकांवर झालेला दहशतवादी हल्ला देशविरोधी असून, त्यावर राजकारण करू नये, असे मत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी व्यक्त केले. केंद्र सरकारने दहशतवाद संपल्याचा दावा केला असला, तरी पहलगाम हल्ल्याने सुरक्षा यंत्रणांमध्ये कमतरता असल्याचे स्पष्ट झाले आहे. सरकारने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने सुधारात्मक पावले उचलावीत, अशी मागणी पवार यांनी केली. देशाच्या सुरक्षेसाठी जे काही निर्णय घेतले जातील, त्यांना पक्षाचा पूर्ण पाठिंबा असेल, असेही त्यांनी जाहीर केले.

सिंधुदुर्ग येथे प्रसारमाध्यमांशी बोलताना शरद पवार म्हणाले, "केंद्र सरकार गेल्या काही काळापासून दहशतवाद संपवल्याचा दावा करत आहे. दहशतवाद कमी होत असेल तर ते स्वागतार्ह आहे. पण पहलगाममधील हल्ल्याने कुठे तरी कमतरता असल्याचे दिसून येते. सरकार या बाबतीत कमी पडले आहे. ही कमतरता दूर करण्यासाठी तातडीने उपाययोजना कराव्या लागतील." त्यांनी इंटेलिजन्स यंत्रणेच्या अपयशावरही बोट ठेवले. "पहलगाम हे तुलनेने सुरक्षित ठिकाण आहे. दोन-तीन महिन्यांपूर्वी मी स्वत: तिथे गेलो होतो. अशा ठिकाणी हल्ला घडणे हे धक्कादायक आहे. दहशतवाद्यांनी आपले उद्दिष्ट साध्य केले, हा निष्कर्ष चिंताजनक आहे. यापुढे अधिक सावधगिरी बाळगावी लागेल," असे ते म्हणाले.

पवार यांनी या हल्ल्याचे राजकारण करू नये, असे आवाहन केले. ते म्हणाले, "काश्मीरमधील हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर सर्व देशवासीयांनी एकजुटीने सरकारच्या पाठीशी उभे राहायला हवे. दहशतवाद्यांनी भारताविरोधात कारवाई केली आहे. देशाविरोधातील अशा कृत्यांवर राजकारण करणे योग्य नाही." केंद्र सरकारने बोलावलेल्या सर्वपक्षीय बैठकीत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने खासदार सुप्रिया सुळे उपस्थित होत्या. "सर्व राजकीय पक्षांनी सरकारला सहकार्य करण्याची भूमिका घेतली, याचा आनंद आहे. जे काही निर्णय घेतले जातील, त्यात आम्ही सरकारसोबत आहोत," असे पवार यांनी स्पष्ट केले.

हल्ल्यादरम्यान दहशतवाद्यांनी पर्यटकांचा धर्म विचारून गोळीबार केल्याच्या दाव्यांबाबत पवार यांनी सावध प्रतिक्रिया दिली. ते म्हणाले, "याबाबत मला स्पष्ट माहिती नाही. मात्र, मी एका पीडित कुटुंबाला भेटलो, तेव्हा त्यांनी सांगितले की, महिलांना हात लावला गेला नाही, फक्त पुरुषांना लक्ष्य केले गेले." हल्ल्यामुळे काश्मीरच्या पर्यटनावर विपरीत परिणाम होण्याची भीती त्यांनी व्यक्त केली. "काश्मीरच्या लोकांचा चरितार्थ पर्यटनावर अवलंबून आहे. हा हल्ला झाल्याने काही काळ पर्यटक काश्मीरला जाणे टाळतील, यामुळे स्थानिक अर्थव्यवस्थेचे मोठे नुकसान होईल," असे ते म्हणाले.

मात्र, पवार यांनी काश्मिरी जनतेच्या एकजुटीचे कौतुक केले. "हल्ल्यानंतर स्थानिक लोक रस्त्यावर उतरले आणि त्यांनी भारताच्या बाजूने ठाम भूमिका घेतली. ही बाब समाधानकारक आहे," असे त्यांनी नमूद केले. सरकारने या हल्ल्याला गांभीर्याने घेऊन सुरक्षा यंत्रणा मजबूत करावी, अशी अपेक्षा व्यक्त करताना पवार यांनी देशाच्या सुरक्षेसाठी पक्षाची एकजूट दर्शवली.

# भारतीय नौदलाची युद्धासाठी तयारी अरबी समुद्रात युद्धनौकांची चाचणी



**मुंबई, दि. २७ प्रतिनिधी**

जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारताच्या तिन्ही संरक्षण दलांनी युद्ध सरावाद्वारे आपली ताकद दाखवण्यास सुरूवात केली आहे. आज अरबी समुद्रात तैनात असलेल्या भारतीय नौदलाच्या युद्धनौकांनी भव्य शक्तीप्रदर्शन करत जहाजविरोधी क्षेपणास्त्रांचे यशस्वी प्रक्षेपण केले.

भारतीय नौदलाच्या जहाजांनी लांब पल्ल्याच्या अचूक आक्रमणासाठी आणि युद्धसज्जतेची चाचणी घेण्यासाठी विविध जहाजविरोधी क्षेपणास्त्रांचे परिक्षण केले. प्लॅटफॉर्म, प्रणाली आणि कर्मचाऱ्यांची तयारीची पडताळणी केली. भारतीय नौदल देशाच्या सागरी सीमांचे रक्षण करण्यासाठी आणि कधीही, कुठेही, कसेही, युद्धासाठी सज्ज आहे, असे भारतीय नौदलाने म्हटले आहे.

यापूर्वी, भारतीय नौदलाने अरबी समुद्रात स्वदेशी बनावटीची विमानवाहू युद्धनौका आयएनएस विक्रांत तैनात केली आहे. भारत आणि पाकिस्तानमधील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर हा एक धोरणात्मक संकेत मानला जात आहे. २२ एप्रिल रोजी जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर ही तैनाती करण्यात आली आहे. 'एक्स' वर पोस्ट केलेल्या उपग्रह प्रतिमांमध्ये 'विक्रांत' अरबी समुद्रात जाताना दिसत आहे.

## पाकिस्तानचा स्वत:च्याच पायावर धोंडा

# भारताशी सरसकट व्यापारबंदीमुळे ओढवले मोठे संकट

**इस्लामाबाद, दि. २७ वृत्तसंस्था**

पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर पाकिस्तानवर दबाव वाढवण्यासाठी भारताने अटारी सीमा बंद केली आहे. त्यामुळे उभय देशांमधील उरलासुरला व्यापार व्यवहार संपुष्टात आला आहे. पाकिस्ताननेही भारताबरोबरचे व्यापारी संबंध स्थगित केले आहेत. मात्र, याचा पाकिस्तानलाच मोठा फटका बसेल अशी शक्यता वर्तवली जात आहे. याच भितीने पाकिस्तानने तिथल्या जनतेसाठी काही महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत. पाकिस्तानी सरकारने देशात औषधांचा तुटवडा निर्माण होऊ नये यासाठी आपत्कालीन उपाययोजना सुरू केल्या आहेत.

भारताने सिंधू जलकरार स्थगित केल्यानंतर इस्लामाबादने नवी दिल्लीबरोबरचा व्यापार स्थगित केला आहे. त्यानंतर काही उपाययोजना सुरू केल्या आहेत. जिओ न्यूजने दिलेल्या वृत्तानुसार पाकिस्तानने त्यांच्या औषधांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी उपाययोजना राबवण्यास सुरुवात केली आहे. तिथल्या औषध नियामक प्राधिकरणाने म्हणजेच डीआरएपीने आपत्कालीन योजना तयार केली आहे. डीआरएपीमधील वरिष्ठ अधिकाऱ्याच्या हवाल्याने म्हटलं जिओ न्यूजने म्हटलं आहे की २०१९ मधील संकटानंतर पाकिस्तानने अशा प्रकारच्या आव्हानांना तोंड देण्यासाठी तयारी सुरू केली आहे. देशातील औषधांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी पर्यायी मार्ग शोधले आहेत.

पाकिस्तानातील औषध उद्योग हा काही अंशी भारतातील कच्च्या मालावर अवलंबून आहे. तिथल्या औषध उत्पादक कंपन्या ३० ते ४० टक्के कच्चा माल भारताकडून आयात करतात. पाकिस्तान आता चीन, रशिया व अनेक युरोपीय देशांकडून पर्यायी स्त्रोत शोध आहे. जेणेकरून पाकिस्तानमधील औषधांची गरज पूर्ण होईल व औषधांचा तुटवडा निर्माण होणार नाही. प्रामुख्याने रेबीजविरोधी लस, सर्पदंशानंतर दिलं जाणारं औषध (वेनोम), कर्करोगावरील औषधे, मोनोक्लोनल अँटीबॉडीज व इतर महत्त्वपूर्ण जैविक उत्पादनांसाठी पाकिस्तान भारतावर अवलंबून आहे.

डीआरएपीने म्हटलं आहे की पाकिस्तानचा आरोग्य विभाग कुठल्याही संकटाचा सामना करू शकतो. मात्र औषध उद्योगातील सूत्रांनी व आरोग्य तज्ज्ञांनी इशारा दिला आहे की भारताबरोबरचा व्यापार थांबवल्याने आपल्याला प्रतिकूल परिणामांचा सामना करावा लागू शकतो. पाकिस्तानी सरकारने व्यापार स्थगित करण्याची घोषणा केल्यानंतरही पाकिस्तानच्या आरोग्य मंत्रालयाला औषधांच्या आयातीची स्थिती स्पष्ट करण्याचे अधिकृत आदेश मिळालेले नाहीत. त्यामुळे पाकिस्तानच्या आरोग्य विभागाला व औषध उद्योगाला भिती आहे की पुरवठा साखळीत भारतामुळे येणाऱ्या या व्यत्ययामुळे औषधांची गंभीर टंचाई निर्माण होऊ शकते.

# दिल्लीत 5 हजार पाकिस्तानी नागरिकांची गुप्तचर विभागाने ओळख पटवली



**नवी दिल्ली, दि. २७ वृत्तसंस्था**

पाकिस्तानी नागरीकांचा भारत सोडण्याचा आज शेवटचा दिवस आहे. आजपासून पाकिस्तानी नागरिकांचे अल्पकालीन व्हिसा रद्द होणार आहेत. दरम्यान, गुप्तचर विभागाने दिल्लीत राहणाऱ्या सुमारे ५ हजार पाकिस्तानी नागरिकांची ओळख पटवली आहे.

जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यानंतर केंद्र सरकारने गुप्तचर विभागाला दिल्लीत राहणाऱ्या पाकिस्तानी नागरिकांची यादी देण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार गुप्तचर विभागाने दिल्लीत राहणाऱ्या सुमारे ५००० पाकिस्तानी नागरिकांची यादी शहर पोलिसांना दिली आहे. फॉरेन रीजनल रजिस्ट्रेशन ऑफिस ने ही यादी पोलिसांच्या विशेष शाखेकडे पाठवल्यानंतर पडताळणीसाठी ती जिल्हा युनिट्सकडे पाठवली आहे. यादीतील अनेक पाकिस्तानी नागरीकांचे व्हिसे रद्द करण्यात आले आहेत. दीर्घकालीन व्हिसा असलेल्या विशेषतः हिंदू पाकिस्तानी नागरिकांना सूट देण्यात आली आहे.

गृह मंत्रालयाने स्पष्ट केले आहे की, २७ एप्रिलपासून वैद्यकीय, राजनैतिक आणि दीर्घकालीन व्हिसा वगळता उर्वरित व्हिसे रद्द केले जातील. त्यामुळे दिल्लीत हालचालींना वेग आाला असून अधिकारी ३,००० आणि २००० नावांच्या दोन वेगवेगळ्या यादींमध्ये नावे जुळत आहेत का, याची पडताळणी करत आहेत.

# मुर्शिदाबाद येथील दोघांच्या हत्येप्रकरणी मुख्य आरोपीला अटक

**कोलकाता, दि. २७ वृत्तसंस्था**

पश्चिम बंगालमधील हिंसाचार झालेल्या मुर्शिदाबाद जिल्ह्यात एका व्यक्ती आणि त्याच्या मुलाच्या हत्येप्रकरणी मुख्य आरोपीला अटक करण्यात आली आहे. पश्चिम बंगाल पोलिसांच्या स्पेशल टास्क फोर्सने या आरोपीला अटक अटक केली आहे . पोलिस सूत्रांनी सांगितले की, हावडा जिल्ह्यातील डोमजूर परिसरात काल रात्री फेकरुल एसके उर्फ मोहक नावाच्या २४ वर्षीय तरुणाला अटक करण्यात आली.

हा आरोपी मुर्शिदाबाद जिल्ह्यातील शमसेरगंज भागातील रहिवासी आहे. एसटीएफने दिलेल्या माहितीनुसार, या आरोपीने पंडितांवर धारधार शस्त्राने हल्ला केला आणि १२ एप्रिल रोजी मुर्शिदाबाद येथे झालेल्या हिंसाचारात त्याने वडिल आणि मुलाची हत्या केली .

हा दुहेरी हत्याकांडानंतर फेकरुल शेख फरार होता. तो हावडा येथे जाऊन लपून बसाला आश्रय घेतला आणि डोमजूरमध्ये मजूर म्हणून काम करू लागला. अटकेत असलेल्या इतर आरोपींच्या चौकशीदरम्यान त्याचे नाव उघड झाले होते. त्यांच्या जबाबाच्या आधारे, एसटीएफने डोमजूर परिसरात छापा टाकला आणि काल रात्री फेकरुलला अटक केली. या प्रकरणात पश्चिम बंगाल पोलिसांनी केलेली ही पाचवी अटक आहे.




वक्फ कायद्यातील सुधारणांविरोधात करण्यात आलेल्या आंदोलनांदरम्यान झालेल्या हिंसाचारात किमान तीन जणांचा मृत्यू झाला आहे.

मुस्लिम समाजातील नागरिकांनी दान केलेल्या वक्फ मालमत्तांचे व्यवस्थापन करणाऱ्या वक्फ कायद्यात काही सुधारणा करण्यात आल्या आहेत. या कायद्याविरोधात पश्चिम बंगालच्या मुर्शिदाबाद आणि दक्षिण २४ ररगणा जिल्ह्यात अनेक भागात हिंसाचार झाला होता. यामध्ये तीन जणांचा मृत्यू झाला. यावेळी हिंसाचारात अनेक हिंदूंची घरे तोडण्यात आली होती.

११ एप्रिल रोजी हरोगोबिंदो दास (७०) आणि त्यांचा मुलगा चंदन (४०) यांचे मृतदेह अनेक वार केलेल्या अवस्थेत जाफ्राबाद येथे आढळून आले होते. या हत्येप्रकरणी तीन जणांना अटक करण्यत आली आहे. दरम्यान भीतीमुळे पुजारी हजर न राहिल्याने कुटुंबाला वडील-मुलाचे अंतिम संस्कार स्वतःच करावे लागले, असे एका वृत्तात म्हटले आहे.

# पोलादी भारतासाठी एकत्र या -इंडिया स्टील 2025 परिषदेत पंतप्रधानांचे आवाहन



लवचिक पण पोलादी व मजबूत भारताची उभारणी करण्यासाठी पोलाद [स्टील ] क्षेत्रातील उद्योगांनी एकत्र यावे असे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्टील २०२५ परिषदेच्या उदघाटन प्रसंगी दृक श्राव्य माध्यमाद्वारे संवाद साधताना केले. पोलाद हे उदयोन्मुख उद्योगक्षेत्र आहे. या क्षेत्रासाठी देशाला कच्च्या मालाचा पुरवठा सुरक्षित करण्यासाठी जागतिक भागीदारी मजबूत करण्याची आवश्यकता आहे. यासाठी पोलाद उत्पादन वाढविण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या ग्रीनफिल्ड खाणींमधून लोहखनिज काढणाया सुरवात करण्याचे आवाहन पंतप्रधानांनी केले. देश अजूनही निकेल,कोकिग, कोळसा आणि मँगेनीज साठी आयातीवर अवलंबून आहे. म्हणूनच आपण जागतिक भागीदारी अधिक मजबूत केली पाहिजे. पुरवठा साखळी सुरक्षित केली पाहिजे आणि तंत्रज्ञानाच्या सुधारणांवर लक्ष केंद्रित केले पाहिजे याकडे देखील मोदींनी लक्ष वेधले.

मोदी म्हणाले कि,' २०२३ पर्यंत स्टील उत्पादन क्षमता ३० कोटी टनापर्यंत वाढविन्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये स्टील उत्पादनक्षमता १७९ मेट्रिक टन होती. त्याच कालावधीत दरडोई स्टीलचा वापर सध्याच्या ९८ किलोवरून १६० किलोपर्यंत वाढविण्याचे लक्ष देखील आहे'.

पंतप्रधानांनी सांगितले कि,'देश १.३ लाख कोटी अमेरिकन डॉलरच्या राष्ट्रीय पायाभूत सुविधांना पुढे नेत आहे. आणि शहरांना मोठ्या प्रमाणात स्मार्ट सिटी मध्ये रूपांतरित करण्यासाठी व्यापक स्तरावर काम सुरु आहे. रस्ते,बंदरे,रेल्वे ,विमानतळे यांचा विकासाचा अभूतपूर्व वेग स्टील क्षेत्रासाठी नवीन संधी निर्माण करत आहे.

**लोकार्थ**

# ड्रीम टेक्नॉलॉजीची पहिली भारतीय ब्रँड ॲम्बेसेडर कृति सेनन

स्मार्ट होम टेक्नॉलॉजी क्षेत्रात जागतिक नेतृत्व असलेल्या ड्रीम टेक्नॉलॉजीनं बॉलिवूड अभिनेत्री कृति सेनन हिला आपला पहिला भारतीय ब्रँड ॲम्बेसेडर जाहीर केलं आहे. ही भागीदारी भारतात नाविन्यपूर्ण आणि बुद्धिमान गृह उपाययोजना आणण्याच्या ड्रीमच्या प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा आहे, जो रोजच्या घरगुती कामांना अधिक सोपं आणि कार्यक्षम बनवण्याच्या दिशेनं एक नवी व्याख्या ठरतो आहे.

कृति सेनन आणि ड्रीम टेक्नॉलॉजी यांच्यातील ही जोडी भारतातील कंपनीचं अस्तित्व आणखी मजबूत करण्यासाठी एक मोठं पाऊल आहे. यामागचा उद्देश म्हणजे अशा भारतीय ग्राहकांना लक्षात घेऊन स्मार्ट उपाययोजना देणं, जे स्वच्छता आणि पर्सनल केअरसाठी इंटेलिजंट प्रोडक्ट्स शोधत आहेत, जेणेकरून ते स्वतःच्या स्वप्नातील आयुष्याकडे लक्ष केंद्रित करू शकतील.कृति सेनन ड्रीम टेक्नॉलॉजीच्या स्मार्ट होम क्लीनिंग आणि ग्रूमिंग प्रोडक्ट्सच्या विस्तृत श्रेणीचं प्रतिनिधित्व करतील. यामध्ये हात न लावता घराची स्वच्छता करणारे इंटेलिजंट रोबोटिक व्हॅक्यूम, हाय-परफॉर्मन्स कॉर्डलेस स्टिक व्हॅक्यूम, ओलसर व कोरडा कचरा दोन्ही साफ करणारे मल्टी-यूज व्हॅक्यूम, आणि एअरस्टाइल व हाय-स्पीड हेअर ड्रायरसारखे ग्रूमिंग प्रोडक्ट्स यांचा समावेश आहे. हे सगळे प्रोडक्ट्स अशा लोकांसाठी आहेत जे स्मार्ट, जलद आणि कंफर्टेबल जीवनशैली शोधत आहेत.




# एसबीआय म्युच्यूअल फंडातर्फे गुंतवणूकदारांसाठी एफओएफ योजना

भारतातील सर्वात मोठे फंड घराणे असलेल्या एसबीआय म्युच्यूअल फंडाने एसबीआय इन्कम प्लस आर्बिट्रेज ॲक्टिव्ह एफओएफ ही नवीन फंड योजना आणली आहे. मुदतमुक्त श्रेणीतील ही फंड ऑफ फंड स्वरुपाची योजना सक्रीयपणे व्यवस्थापित केल्या जाणाऱ्या डेट योजनांमध्ये त्याचबरोबर आर्बिट्रेज म्युच्यूअल फंड योजनांच्या युनिटसमध्ये गुंतवणूक करणार आहे. ही नवीन फंड ऑफर (एनएफओ) २३ एप्रिल ते ३० एप्रिल २०२५ दरम्यान गुंतवणूकीसाठी खुली राहणार आहे. सक्रियपणे व्यवस्थापित डेट-केंद्रित योजना आणि आर्बिट्रेज म्युच्युअल फंड योजनांच्या युनिट्समध्ये गुंतवणूक करून नियमित उत्पन्न आणि भांडवलाची वाढ करणे, हे या योजनेच्या गुंतवणुकीचे उद्दिष्ट असणार आहे. तथापि, योजनेचे गुंतवणुकीचे उद्दिष्ट साध्यच होईलच, याची कोणतीही हमी किंवा खात्री ही योजना देत नाही. योजनेसाठी फर्स्ट-टिअर आधारभूत निर्देशांक हा ६५ टक्के निफ्टी कॉम्पॉझिट डेट इंडेक्स आणि ३५ टक्के निफ्टी फिफ्टी आर्बिट्रेज इंडेक्स यांचे संयुक्त मिश्रण राहणार आहे. या दोन निर्देशांकाआधारे ही योजना आपली वाटचाल करणार आहे.

# डब्ल्यूटीसी मुंबई आणि टिसर कृत हस्तकलेसाठी आरोहण कौशल्य केंद्र

ऑल इंडिया असोसिएशन ऑफ इंडस्ट्रीज (एआयएआय), वर्ल्ड ट्रेड सेंटर (डब्ल्यूटीसी) मुंबई आणि टिसर आर्टिझन्स ट्रस्ट यांनी शाश्वतता, सर्जनशीलता आणि सहकार्यावर केंद्रित असलेल्या दोन दिवसांच्या महाकोलॅब कार्यक्रमादरम्यान डब्ल्यूटीसी मुंबई येथे आरोहण कौशल्य केंद्राचे उद्घाटन केले. या कार्यक्रमात शाश्वत डिझाइन, समुदाय-चालित नवोन्मेष आणि सामाजिक परिणाम प्रदर्शित केले गेले, ज्यामध्ये शाश्वत भविष्य घडवण्यात कारागिरांच्या भूमिकेवर भर देण्यात आला. आरोहण कौशल्य केंद्राचे उद्दिष्ट महिला कारागिरांसाठी व्यावसायिक कौशल्ये प्रदान करणे आणि उपजीविका आणि उद्योजकतेच्या संधी निर्माण करणे आहे. भारतीय नाट्य अभिनेत्री आणि कास्टिंग डायरेक्टर सुश्री डॉली ठाकोर यांनी उद्घाटन समारंभाला उपस्थिती लावली.हा कार्यक्रम आघाडीच्या सामाजिक उपक्रम टिसर आर्टिझन्स ट्रस्ट, ऑल इंडिया असोसिएशन ऑफ इंडस्ट्रीज (एआयएआय) आणि डब्ल्यूटीसी मुंबई यांनी संयुक्तपणे आयोजित केला होता आणि शाश्वतता, चक्राकारता आणि नवोन्मेष यावर अभ्यासपूर्ण पॅनेल चर्चा आयोजित केल्या होत्या.

संकलन –संयोजन
**सुबोध रणशेवरे**
संपर्क -९८३३१४६३५६
ईमेल -subodh.ranshevre @rediffmail.com

# दोन वर्षे वडिलांचा मृतदेह कपाटात लपवून ठेवला

**टोक्यो, दि. २७ वृत्तसंस्था**

जपानमध्ये एक धक्कादायक घटना घडली आहे. एका मुलाने आपल्या वडिलांचा मृतदेह दोन वर्षे कपाटात लपवून ठेवल्याचा प्रकार समोर आला आहे. वडिलांचा मृतदेह कपाटात दोन वर्ष लपवून ठेवल्याचं कारण जेव्हा समोर आलं तेव्हा सर्वांनाच धक्का बसला आहे. या प्रकरणात आता पोलिसांकडून मुलाला अटक करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.

जपानी पोलिसांना असं आढळून आलं की नोबुहिको सुझुकीने वडिलांचा मृतदेह दोन वर्षे कपाटात लपवून ठेवला होता. वृत्तानुसार, जानेवारी २०२३ मध्ये ८६ वर्षीय वडिलांचं निधन झालं होतं. मात्र, तेव्हापासून आतापर्यंत मृतदेह लपवून ठेवण्यात आला. अंत्यसंस्काराचा खर्च वाचवण्यासाठी हे कृत्य केल्याची माहिती त्याने पोलिसांना सांगितली आहे.

वृत्तानुसार, सुझुकीने एका आठवड्यापासून टोकियोमध्ये त्यांचं छोटसं चायनीज रेस्टॉरंट उघडलं नव्हतं. ज्यामुळे शेजाऱ्यांना चिंता लागली आणि त्यांनी पोलिसांशी संपर्क साधला. पोलीस अधिकारी सुझुकीच्या घरी त्याची चौकशी करण्यासाठी पोहोचले. तेव्हा पोलिसांना घरातील कपाटात लपवलेल्या अवस्थेत वडिलांच्या मृतदेहाचा सांगाडा सापडला. यानंतर पोलिसांनी चौकशी केली असता अंत्यसंस्काराचा खर्च परवडत नसल्याचं त्याने सांगितलं.

दरम्यान, पोलिसांना अद्याप सुझुकीच्या वडीलांच्या मृत्यूचं कारण समजू शकलेलं नाही. जानेवारी २०२३ मध्ये वयाच्या ८६ व्या वर्षी त्याच्या वडिलांचे निधन झाल्यानंतर त्याने मृतदेह लपवून ठेवल्याचं सुझुकीने पोलिसांना सांगितलं असलं तरी त्याच्या वडिलांचा मृत्यू नेमकं कसा झाला याबद्दल कोणतीही माहिती पोलिसांना मिळाली नाही. पण सुझुकीने दावा केला की जेव्हा तो कामावरून घरी आला तेव्हा त्याला त्याच्या वडिलांचा मृतदेह आढळून आला होता. दरम्यान, या संपूर्ण प्रकरणात पोलिसांकडून तपास सुरु करण्यात आला आहे. तसेच पोलिसांनी मुलगा सुझुकी याला ताब्यात घेतलं आहे.

# सामाजिक कार्यकर्त्याची दहशतवाद्यांकडून हत्या

**कुपवाडा, दि. २७ वृत्तसंस्था**

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर, संपूर्ण जम्मू आणि काश्मीरमध्ये सुरक्षा दल सतर्क असताना, दहशतवाद्यांनी एका सामाजिक कार्यकर्त्याची गोळ्या घालून हत्या केली आहे. पोलीस अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, मृताचे नाव गुलाम रसूल मगरे असे आहे.

शनिवारी रात्री उशिरा कुपवाडा जिल्ह्यातील कानी खास भागात दहशतवाद्यांनी त्याच्या घरात घुसून त्याच्यावर गोळीबार केला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मगरे यांना रुग्णालयात नेण्यात आले जिथे त्यांचा मृत्यू झाला. मागरे ४४ वर्षांचे होते. आतापर्यंत कोणत्याही दहशतवादी संघटनेने या घटनेची जबाबदारी स्वीकारलेली नाही. पोलिसांनी या घटनेचा तपास सुरू केला आहे.

पहलगाममध्ये २६ जणांच्या हत्येनंतर जम्मू-काश्मीर पोलीस आणि सुरक्षा दल काश्मीर खोऱ्याच्या सतर्क झाले आहेत. परंतु इतका कडक बंदोबस्त असूनही, दहशतवाद्यांनी ही हत्या केली. पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर सुरक्षा दल काश्मीरमध्ये मोठ्या प्रमाणात कारवाई करत आहेत. अनेक दहशतवाद्यांची आणि त्यांना मदत करणाऱ्यांची घरे उद्ध्व करण्यात आली आहेत. तर आतापर्यंत २००० हून अधिक लोकांना चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आले आहे.

केंद्रीय गृह मंत्रालयाच्या सूचनेनुसार, राष्ट्रीय तपास संस्थेने (एनआयए) पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा तपास हाती घेतला आहे. या प्रकरणात नवीन एफआयआर देखील नोंदवण्यात आला आहे. आतापर्यंतच्या तपासात असे दिसून आले आहे की, किमान चार दहशतवादी पहलगामच्या बैसरनम कुरणात एम४ कार्बाइन असॉल्ट रायफल्स आणि एके-४७ ने गोळीबार केला.

## पाकिस्तानच्या मंत्र्याची दर्पोक्ती

# पाणी रोखाल तर 130 अणुबॉम्ब तयार ठेवलेत

**इस्लामाबाद, दि. २७ वृत्तसंस्था**

जम्मू-काश्मिरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात २६ जणांचा मृत्यू झाला. त्यानंतर भारताने सिंधु पाणी वाटप करार, शिमला कराराला स्थगिती दिली. तर पाकिस्तानने त्यांचे हवाई क्षेत्र भारतासाठी बंद केले. आता भारत पाकिस्तानाला धडा शिकविण्याच्या तयारीत असतानाच पाकिस्तानच्या मंत्र्याने चक्क भारतालाच अण्वस्त्र हल्ल्याची धमकी दिली आहे. त्यामुळे देशभरातून संताप व्यक्त होत आहे. पाकिस्तानचे मंत्री हनिफ अब्बासी यांनी भारताला उघडउघड अणुहल्ल्याची धमकी दिली. पाकिस्तानकडे असलेली घोरी, शाहीन आणि गजनवी ही क्षेपणास्त्रे आणि १३० अणुबॉम्ब फक्त भारतासाठीच ठेवले आहेत. जर भारताने सिंधू जल करार थांबवून पाकिस्तानचा पाण्याचा पुरवठा रोखण्याचा प्रयत्न केला, तर भारताला पूर्ण युद्धासाठी तयार राहावं लागेल. पाकिस्तानची अण्वस्त्रं प्रदर्शनासाठी ठेवलेली नाहीत, ती देशभर लपवून ठेवली असून कोणतीही चूक झाल्यास ती तत्काळ वापरण्यात येतील. आमच्याकडे असलेली लष्करी साधनं, क्षेपणास्त्रं ही केवळ शोभेसाठी नाहीत. आमची अण्वस्त्रे कुठे आहेत, हे कुणालाही माहिती नाही. मी पुन्हा सांगतो, ही सगळी बॅलिस्टिक क्षेपणास्त्रं भारतावरच लक्ष ठेवूनच तयार केलेली आहेत," असा इशारा त्यांनी दिला. भारताने पाण्याचा पुरवठा आणि व्यापार संबंध थांबवल्यानंतर अब्बासी यांनी दिल्लीचा उपहास करत सांगितले की भारत आता आपल्या निर्णयांचे गंभीर परिणाम समजू लागला आहे. पाकिस्तानने भारतीय विमानांसाठी हवाई हद्द बंद केल्यानंतर निर्माण झालेल्या गोंधळाकडे लक्ष वेधत अब्बासी म्हणाले, "जर हे असंच दहा दिवस चाललं, तर भारतातील विमान कंपन्या दिवाळखोरीत जातील."

# कोकणात उभारणार भव्य गो शाळा; नारायण राणेंची घोषणा

**कणकवली, दि. २७ प्रतिनिधी**

माजी केंद्रीय मंत्री नारायण राणे कणकवलीत गो शाळा उभारणार आहेत. यामुळे गोसंवर्धन होण्यासोबतच स्थानिकांना रोजगार मिळणार असल्याची माहीती त्यांनी पत्रकार परिषदेत दिली. सिंधुदुर्ग जिल्ह्यात ११ मे रोजी गोवर्धन गो शाळा शुभारंभ होणार आहे. या कार्यक्रमाला देवेंद्र फडणवीस उपस्थित राहणार आहेत. राज्याच्या तुलनेत एक वेगळी गो शाळा जिल्ह्यात होणार असल्याची माहिती नारायण राणेंनी पत्रकार परिषदेत दिली.

हिंदू धर्मात गाय पवित्र मानले जाते. गाय म्हणजे समृद्धी. जिल्ह्यातील लोकांनी गाय पाळावी म्हणजे समृद्धीचा मार्ग येईल. म्हणून मी हा प्रयत्न करत असल्याचे नारायण राणे म्हणाले. गो शाळेत गाईच्या अनेक जाती असणार आहेत.



जिल्ह्यातील लोकांनी दुधाचा व्यवसाय करण्याचे आवाहन राणेंनी यावेळी केले. कणकवीलीती करंजे गावात भव्य गोशाळा उभारली जाणार आहे. येथे दूध संकलनाची व्यवस्था केली जाणार असून ५ रुपये किलोने शेण घेतले जाणार आहे. तसेच गोमूत्रदेखील घेतलं जाणार आहे. खताची फॅक्टरीदेखील सुरु केली जाणार आहे. जिल्ह्यात शेणापासून रंग बनविण्याची फॅक्टरी तयार केली जाणार आहे. शेळी मेंढी प्रकल्पदेखील त्याच ठिकाणी असेल अशी माहिती राणेंनी यावेळी दिली.

१९८२ पासून मी मुंबईमध्ये कोंबडीचा व्यवसाय करत होतो. आतां भाऊ सांभाळतो. काही लोक माझा कोंबडीवाला म्हणून उल्लेख करतात. भ्रष्टाचार करण्यापेक्षा धंदा केलेला बरा. कोविड काळात भ्रष्टाचार झाला. मातोश्रीपासून नाव आहेत.सशक्त मूल झाली तर मेंदू चांगला होतो. प्रत्येक माणसाने योगदान दिल पाहिजे, असेही ते यावेळी म्हणाले. पहलगाममध्ये जी घटना घडली त्याचं वाईट वाटतं. विरोधकांनी मोदींना जे समर्थन दिले मी त्यांचे कौतुक करतो. यावेळी त्यांनी शंकराचार्यांच्या विधानावार प्रतिक्रिया दिली. मी शंकराचार्य यांचा आदर करतो. तुम्ही देशापेक्षा मोठे नाही देशाच्या विषयावर त्यांनी भाष्य करू नये. त्यांना तो अधिकार नाही, असेही ते म्हणाले.

राज्याचा विकास व्हावा यासाठी मुख्यमंत्री प्रयत्न करत आहेत. दोडामार्गमध्ये जिंदाल आणि अदानी यांच्यासोबत मी बैठका घेणार आहे. ५०० कारखाने त्याठिकाणी येतील. जिल्ह्याचे दरडोई उत्पन्न साडे तीन लाख पर्यंत जाईल असा माझा प्रयत्न असेल असे राणे म्हणाले.

मी एवढ्या वर्षात कोणाला छळले, पैसे मागितले असतील तर सांगितल्यास मी पद सोडेन. विनायक राऊतने कोणत्या विषयात भ्रष्टाचार केला नाही? असा प्रश्न त्यांनी विचारला. वैभव नाईक १० वर्ष आमदार होते पण विधानसभेत बोलताना मी कधी बघितले नाही. उलट निलेशचे पहिल्या दिवशी कौतुक झाल्याचे ते म्हणाले.

महासागर NASHIK Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak at S. R. publication, Mohan - Arjun Compund, Godown No. 8, 9 & 10, Near Ghartan Pada, Vaishali Nagar Last Bus Stop, Dahisar (E),Mumbai - 400068 and Published From 'ANANDI', KOTWAL PARK, TILAKWADI, APP. VED MANDEER, DHAMANKAR CORNER, NASHIK 422002 , Editor - SHRIKRISHNA TANSUKHDAS CHANDAK Executive Editor- Sanju Pawar, Resident Editor- Jayant Mahajan.

महासागर नाशिक हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी एस. आर. प्रिंटर्स, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडावून नं. ८,९,१०, घरटन पाडा, वैशाली नगर, दहिसर ईस्ट, मुंबई येथे मुद्रीत करून 'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर, धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२ . येथून प्रकाशित केले. कार्यकारी संपादक - संजू पवार (मो. नं. ९८९०१०९९७८) निवासी संपादक - जयंत महाजन (९४२०६९१४२०) Email : mumbaimahasagar@gmail.com